मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

बुधवार दि. १५ ऑक्टोबर १९९७ रोजी झालेल्या ४८ व्या बैठकीचा

कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ४८ वी बैठक बुधवार दि. १५ ऑक्टो. ९७ रोजी दुपारी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१]	ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण,	सभापती.
२]	श्री एम. बी. अप्पलवार,	मुख्य अधिकारी.
३]	,, वि. म. कोकणे,	उपसचिव, महाराष्ट्र शासन.
४]	,, विनोद खोपकर	सदस्य.
५]	,, चंद्रकांत विश्वासराव,	,,
६]	,, अमोद उसपकर,	,,
७]	,, भालचंद्र ठाकूर,	,,
८]	,, देवदास साटम,	,,
९]	,, प्रकाश मुबड,	,,
१०]	,, गणेश तिकोने,	,,
११]	डॉ. विनोद मेहता,	,,
१२]	श्री अभय सावरकर,	,,
१३]	,, अनंत पालकर,	,,
१४]	,, दाजी [गोपाळ] मोडक,	,,
१५]	प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी	निमंत्रक.
१६]	उपकर निर्धारक व संकलक [शहरे] म. न. पा.	,,

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकाऱ्यांचे मन:पूर्वक स्वागत करुन सचिवाना सूचना केली की, आजच्या बैठकीस सुरवात करावी.

बैठकीच्या सुरवातीस मा. सदस्य श्री खोपकर यांनी ~~लक्षात आणून~~ ~~दिले~~ की, कालिकादर्शन इमारतीमधून कुटुंबास बाहेर काढण्यात येत आहे व त्या इमारतीच्या जवळपास ते रहात असूनही त्याबाबत त्यांना काही माहिती असते. हे जर कुटुंब त्यांच्याकडे गेले तर सदर बाब त्यांना माहित

नसल्याचे सांगायचे का? यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, एखादे धोरण ठरल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशी करावयाची हे मुख्य अधिकारी आणि त्यांचे वर्ग-१, वर्ग-२ चे अधिकारी ठरवित असतात. परंतु काही विशेष घटना घडली, वर्तमानपत्रात छापून आले तर त्याबाबत सन्मा. सदस्य यांनी विचारणा केल्यावरुन अधिकृतपणे त्याबाबतची माहिती संबंधितांनी दिली पाहिजे. त्यानुसार आज आपले अधिकारी सदर माहिती सभागृहास देणार असल्याचे त्यांनी मा. सदस्यांना सांगितले.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी सूचना केली की, नवीन अधिकारी-वर्गाची नेमणूक झालेली आहे त्यांची ओळख करुन देण्यात यावी. यावर मा. सभापती यांनी सूचना केली की, श्री वनीकर यांनी दक्षिण विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची ओळख करुन द्यावी व श्री भूवनदास यांनी उत्तर विभागातील कार्यकारी अभियंता यांची ओळख करुन द्यावी.

मा. सभापतींच्या सूचनेनुसार श्री वनीकर व श्री भूवनदास यांनी खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची ओळख करुन दिली.

दक्षिण परिमंडळ :-

अ. विभाग.	- श्री के. जे. भाटीया यांच्या जागी श्री गुरुमितसिंग डोगरा यांची पदोन्नतीने मुंबई मंडळातून बदली.
सी-१/सी-२ विभाग	- श्री गेडाम यांच्या जागी श्री पिपियानी यांची पदोन्नतीने बदली.
सी-३/सी-४ विभाग	- श्री त्रिवेदी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देऊन श्री साधवाणी यांची नागपूरला बदली.
डी. १ विभाग	- श्री मोहन्ना यांच्या जागी श्री बलबीर सैगल यांची गलिच्छवस्ती सुधार मंडळातून बदली.
डी. २विभाग	- श्री गोडा यांच्या जागी श्री एच. जे. भाटीया. ~~यांची बदली.~~

उत्तर परिमंडळ :-

इ-१ विभाग	- श्री महाजन यांच्या जागी श्री नलावडे यांची पदोन्नतीने बदली.
इ-२ विभाग	- त्याच कार्यालयातील श्री चव्हाण यांची पदोन्नतीने बदली.
पुर्वि. [१] विभाग	- श्रीमती मेधा शेंडे यांची रिक्तपदी बदली,
पु. वि. [२] ,,	- श्री भोगावत,
पु. वि. [३] ,,	- श्री पालीवाल यांची ~~रिक्तपदी बदली.~~ पदोन्नतीने … बदली.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी मागणी केल्यावरून सर्व नवीन तसेच जुन्या अधिकाऱ्यांचे फोन क्रमांक व पत्ते त्यांच्या नांवासह देण्यात येईल असे मा. सभापती यांनी आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी निदर्शनास आणले की, आजच्या बैठकीस विधी सल्लागार यांचे कार्यालयातील कोणीही अधिकारी उपस्थित नाही. यावर मा. सभापती यांनी याची गंभीर दखल घेण्यात येत आहे असे मत व्यक्त करून कार्यवृत्तांचे वाचन करून बैठकीस सुरवात करण्याबाबत सचिव यांना सूचना दिल्या.

सचिव श्री गद्रे यांनी मा. सभापती व मा. सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे स्वागत करून व सर्वांना दिवाळीच्या तसेच नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ४८/१.

विषय- मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या मंगळवार दि. २. ९. ९७ रोजी संपन्न झालेल्या ४७व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

वरील कार्यवृत्तांत पृ. क्र. १ ते ७५ वर सर्व सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी व स्थायी करण्याबाबत सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, पृ. क्र. ५३ वर " लिफ्टला रहिवाशांचा विरोध होता" अशी जी माहिती देण्यात आली आहे ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. कारण ३६, अ. बी. इमारतीतील सर्व रहिवाशांची त्यांनी बैठक घेतली होती व बैठकीत रहिवाशांनी लिफ्टला विरोध केला नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. यावर मा. सभापती यांनी याबाबत योग्य ती नोंद घेऊन खुलासा करण्याच्या सूचना दिल्या असता श्री परब, उ. मु. अभि. [पुनर्रचना] यांनी केलेल्या ~~खुलासा केला. तोंडी स्वरूप~~ खुलाशाने समाधान न होऊन मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, सेटबॅकचा जो चटईक्षेत्र निर्देशांक दिला जातो त्याप्रमाणे या इमारतीचा २००० या चटईक्षेत्र निर्देशांक फुकट घालविण्यात आला आहे. यावर श्री परब यांनी असे निदर्शनास आणले की, जर चटईक्षेत्र निर्देशांक फुकट घालवावयाचा नसता तर लिफ्ट लावावी लागली असती. परंतु रहिवाशांचा विरोध होता. मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, अनेक वेळा रहिवाशी सांगतात की, लिफ्टला जे अतिरिक्त ३५०/- रुपये

दरमहा भरावे लागतील ते त्यांना परवडणार नाहीत. परंतु ती केवळ तोंडी चर्चा झालेली असते.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी माहिती दिली की, या इमारतीमध्ये मुळे भाडेकरू ४८ होते परंतु पुनर्बांधणी योजनेमध्ये ४० गाळे झाले. सदर इमारत दोन वर्षे वितरणाशिवाय पडून होती. कारण इमारतीतील सर्वच्यासर्व म्हणजे ४८ भाडेकरूंना त्याच इमारतीत जागा हवी होती. म्हणून लिफ्टसाठी त्यांची तक्रारीही होती.

यावर मा. सभापती यांनी अशी विचारणा केली की, रहिवाशांनी असे लिहून दिले होते का की, लिफ्टपोटी जरी जास्त पैसे लागले तरी चालेल. परंतु आम्ही सर्व भाडेकरू एकत्रच राहू इच्छितो. चर्चेच्या वेळी श्री परब, उ. मु. अभि. [पुनर्र.] यानी असे निदर्शनास आणाले की, उमरखाडी येथील एका इमारतीतील रहिवाशांचे म्हणणे आहे की, चटईक्षेत्र निर्देशांक फुकट गेला तरी हरकत नाही परंतु त्यांना लिफ्ट नको. यावर मंडळाने त्यांना तसे लेखी देण्यास सांगितले असता लेखी देण्यास नकार दिला. फक्त एक-दोन प्रकरणीच लिहून देण्यात आलेले आहे असेही त्यांनी निदर्शनास आणाले.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणाले की, टी. डी. आर. मुंबईत वापरता येत नाही असे शासनाचे धोरण आहे. परंतु अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे टी. डी. आर. मुंबईत कोठेही वापरता येत असेल तर शासनाने मंडळासाठी काही टी. डी. आर. च्या बाबतीत सवलत दिली आहे का? यावर उ. मु. अभि. [पुनर्र.] श्री परब यांनी निदर्शनास आणाले की, मंडळाचे कार्यक्षेत्र फक्त मुंबईपुरतेच मर्यादित आहे.

मा. सभापती यांनी यावर सहमती दर्शवून असे मत व्यक्त केले की, मंडळाचे कार्यक्षेत्र मुंबईपुरते मर्यादित असल्यामुळे महानगरपालिकेने मंडळास टी. डी. आर. देण्यास तयार आहे परंतु असा टी. डी. आर. नक्की कोठे म्हणजे उपनगरात मिळेल किंवा कसे याबाबत काही उल्लेख नाही. त्यांनी पुढे असे सांगितले की, मा. सदस्य श्री उसपकर यांच्या म्हणण्याप्रमाणे अपुऱ्या माहितीमुळे व योग्य तो पत्रव्यवहार न केल्यामुळे २००० च. फु. नि. फुकट गेला शिवाय ४८ लोक एकत्र रहावयास गेले असते ते गेलेस नाहीत. परंतु हेही खरे आहे की, रहिवाशांना लिफ्ट परवडणारी नाही असे ते सांगतात. म्हणून मंडळाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत रहिवाशांकडून लेखी लिहून घेण्यात यावे नाहीतर सरळ लिफ्ट बांधण्यात यावी. तसेच महानगरपालिकेच्या पत्रात मुं. इ. दु. व. पु. मंडळाचे कार्यक्षेत्र हे मुंबईपुरते मर्यादित असल्यामुळे टी. डी. आर. शहरात वापरावयास मिळेल किंवा कसे याबाबत स्पष्ट उल्लेख असावा असा म. न. पा. च्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. दाजी मोडक यांनी पृ. क्र. ५५ वर मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी मणियार इमारतीतील न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या गाळ्यांच्या संदर्भात माहिती देण्यांत येणार होती, ती माहिती देण्यांत आली आहे का? अशी विचारणा करता मा. सभापती यांनी त्याप्रमाणे माहिती देण्यांत येईल असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री. मोडक यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत त्यांनी उत्तर व दक्षिण विभागातील इमारतींसाठी अंदाजपत्रकात तरतुद करताना उत्तर विभागासाठी कमी रक्कम ठेऊन त्या भागावर अन्याय केला जातो असे मत मांडले होते व त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा केला होता. परंतु त्याची नोंद कार्यवृत्तांतात आलेली नाही. तशी नोंद घेण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली. यावर मा. सभापती यांनी सचिव यांना त्याप्रमाणे कार्यवृत्तांतात नोंद घेण्यासाठी सूचना दिल्या व सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचना व घेतलेल्या हरकतीची नोंद घेण्यांत यावी अशा सूचना देऊन कार्यवृत्तांत सर्वानुमते मंजूर करण्यांत आला.

बाब क्र. ४८. २ .... **पुनर्बांधणी विभाग.**

अ] विषय : इ. क्र. १३ डी, सनमिल लेन, लोअरपरेल, मुंबई या इमारतीच्या नावास मंजूरी मिळणेबाबत.

वरील विषयाचा प्रस्ताव पृ. क्र. ७७ वर सादर करण्यांत आला आहे.

मा. सभापती यांनी "श्याम सुंदर सदन" हे नांव रहिवाशांनी एकमताने ठरविलेले आहे म्हणून त्या नावास मंजूरी देण्यास हरकत नाही, असे मत मांडले.

सविस्तर चर्चेअंती पुनर्रचित इमारतीस "श्याम सुंदरसदन" हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ब] विषय : इक्र. ३३४-३३६ "आमची साखळी", ना. म. जोशी मार्ग, ग. द. विभाग या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

वरील प्रस्ताव पृ. क्र. ७९ ते ८१ वर सादर करण्यांत आला आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, सदर इमारत रा. गा. प्र. तर्फे बांधण्यात येणार होती. परंतु रा. गा. प्र. ची मुदत संपत असल्यामुळे सदर इमारत मुं. इ. दु. व पु. मंडळातर्फे करण्यांत यावी असे ठरले. मागील बैठकीत या विषयाबाबत

...६/-

चर्चा होऊन सदर बाब उपसचिव श्री. कोकणे यांच्या मतानुसार पुढे ढकलून या बैठकीत घेण्यात आली आहे.

आता कायद्याच्या त्रुटीमुळे इमारतीचे रहिवाशी बाहेर फेकले जाऊ नये म्हणून सदर इमारती मंडळाने बांधावयाची आणि प्राधिकरणाने फंड उपलब्ध करून देण्यास मंजूरी दिलेली आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

क] विषय : इ.क्र. ३३४-३३६, "आमची सावली", ना.म.जोशी मार्ग, ग/द विभाग येथील नियोजित इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या निविदा मंजूर करणेबाबत.

....

वरील विषयाचा प्रस्ताव पृ.क्र. ९१ ते ९५ वर सादर करण्यांत आला आहे.

वरील प्रस्तावाबाबतची सविस्तर माहिती संबंधित अधिकाऱ्याने सभागृहास दिली. सविस्तर चर्चेअंती मा. सभापती यांनी माहिती दिली की, सदर निविदा कमितकमी रक्कमेची असून ती मान्य करण्यास हरकत नाही. [illegible] चर्चेअंती सर्वानुमते विषयांकित नियोजित इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या निविदेस मंजूरी देण्याचे ठरले.

ड] विषय : ३६, बी चंपागल्ली, काळबादेवी, सी. विभाग, गणेशभुवन इमारतीच्या पुनर्बांधणी प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

....

वरील विषयाचा प्रस्ताव पृ.क्र. ९७ ते १०९ वर सादर करण्यांत आला आहे.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, शासनाने सदर इमारत पुनर्रचित करून देण्यांत येईल असे आश्वासन दिलेले आहे. यावर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशी विचारणा केली की, मुंबईतील सगळया रहिवाशांना नियम वेगळे आहेत की, या विशिष्ट इमारतीला नियम वेगळा आहे.

यावर मा. सभापती यांनी सगळया रहिवाशांना नियम सारखेच आहेत असे सांगून एखादी पुनर्रचित इमारत सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार मालकी हक्काने जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत ती भाडेपट्टयाने असते आणि दुर्दैवाने ती पडली तर त्या इमारतीची पुनर्रचना करण्याची वैधानीक जबाबदारी मंडळाची असते.

बैठकीत या इमारतीबाबतचा अहवाल एक महिन्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतु, अजूनही काहीही माहिती मिळालेली नाही.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, हे संपूर्ण प्रकरण प्राधिकरणाच्या स्तरावर हाताळले जात असून करंदीकर समितीने प्राधिकरणाकडे अहवाल सादर केलेला आहे. त्यावर प्राधिकरणामध्ये चर्चा होईल, सदर अहवाल गोपनीय असल्याने तो मंडळाकडे पाठविण्यांत आला नाही.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी सदर प्रस्ताव दूर्घटनेचा अहवाल येण्यापूर्वीच मंजूर करावयाचा का अशी विचारणा केली व सदर प्रस्ताव मंजूर करण्यात घाई करण्यांत येत आहे असे वाटते असे मत व्यक्त केले.

यावर मा. सभापतींनी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती केली की, त्यांनी आपले सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबतचे वैयक्तीक मत द्यावे.

मा. सदस्य श्री. भूवड यांनी असे मत मांडले की, इमारत तोडण्यासाठी लागणाऱ्या रक्कमेची तपशिलवार माहिती [ब्रेकअप] देण्यांत आलेली नाही. इमारत तोडण्यासाठी लागणाऱ्या रक्कमेत एक इमारत बांधली जाऊ शकते.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशी विचारणा केली की, सदर बिल हे अंतिम बील आहे का? की आणखी काही बिले येण्याची बाकी आहेत, त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, सदर कामावर ३७,०००/- रुपयांचे फोटो काढलेले आहेत.

यावर श्री. परब, उप. मु. अभि. यांनी माहिती दिली की, चौकशी अधिकारी जे नेमण्यात आले होते त्यांना विविध रिपोर्ट देण्यासाठी त्यांनी २० सेट मागविले होते [illegible]

वरील चर्चेनंतर मा. सभापती यांनी संबंधितांना सूचना दिल्या की, खर्चाचा तपशिल सन्मा. सदस्य यांना देण्यांत यावा.

मा. सदस्य श्री. सावरकर यांनी असे मत व्यक्त केले की, खर्चास मंजूरी बैठकीत देण्यांत येत असल्यामुळे सन्मा. सदस्यांवर काही ठपका येईल असे होता कामा नये, त्याची काळजी घेण्यांत यावी.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, दुर्घटनाग्रस्त इमारत तोडण्यासाठी जो १५ लाख खर्च दाखविण्यांत आलेला आहे तो संयुक्तीक वाटत नाही.

~~मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, सदर ठेकेदाराने परिस्थितीचा गैरफायदा घेतला असे वाटते.~~

...८/-

यावर उपसचिव श्री. कोकणे यांनी असे मत व्यक्त केले की, आपत्कालीन परिस्थितीमध्ये सदर कामे करण्यांत आली आहेत आणि त्यामुळे निविदा मागविणे वगैरे गोष्टी बाजूला ठेवल्या आहेत. मा. सदस्यांच्या मनात जी भावना आहे की, ठेकेदाराने यामध्ये काही गैरफायदा घेतलेला आहे काय? तरी याबाबत आपण या बैठकीत खर्चाचा तपशिल तपासण्यापेक्षा आपण मुख्य अधिकारी यांना प्राधिकृत करू व त्यांनी पहाणी करुन निर्णय घ्यावा. यास सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, प्रस्तावात असे म्हटले आहे की, मृत व्यक्तीचे वारस पुढे न आल्यामुळे व जखमी व्यक्तींचा पत्ता न लागल्यामुळे प्रत्यक्षात सानुग्रह अनुदान दिले जाऊ शकले नाही. परंतु पुढच्याच पृष्ठावर " सर्व भाडेकरुंना स. शि. त जागा देण्यांत आल्या आहेत" असे, अशी परस्पर विरोधी विधाने देण्यांत आली आहेत. कारण सं. शि. त जागा देता म्हणजे माणसे कोठे आहेत ते माहित आहे. यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, ज्या व्यक्ती मृत पावल्या आहेत त्यांची माणसे सानुग्रह अनुदान घेण्यास पुढे आलेली नाहीत असा त्या विधानांचा अर्थ होऊ शकतो.

मुख्य अधिकारी यांनी अधिक स्पष्ट करतांना असे निदर्शनास आणले की, जे मृत पावले ते त्या इमारतीचे रहिवाशीच नव्हते. आजुबाजूचे लोक त्या इमारतीत जाऊन झोपले होते. ते लोक राजस्थानमधील होते. त्यामुळे मुंबई कलेक्टरने राजस्थानमधील कलेक्टरला पत्र लिहिलेले आहे. मृत व्यक्तीचे, त्याचे वारसदार ठरवितांना रक्कम किती लहान वा मोठी असली तरी सक्सेशन दाखला दिल्याशिवाय पैसे देता येत नाहीत. या इमारतीत मृत पावलेल्या व्यक्ती ह्या राजस्थानच्या होत्या व त्याबाबत पत्रव्यवहार चालू असून पेमेंट घेण्यास कोणी पुढे आलेले नाही.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे मत मांडले की, या इमारतीत लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर लोक रहात होते. शिवाय २ निवासी व २० अनिवासी असताना २० निवासी व २ अनिवासी अशी चुकीची माहिती देण्यांत आली आहे. त्या इमारतीचे व्यापारीकरण झाल्यामुळे ती इमारत पडली आहे. त्यामुळे आजचा खर्च मंडळाने का सोसावा? कारण २०-२५ वर्षे लोक सं. शि. त रहात असून, त्यांच्या इमारती पुनर्रचित करण्यासाठी प्लॅन वगैरे तयार असूनही त्यांना डावलून सदर इमारती पुनर्रचित करण्यांत येत आहे हे योग्य नाही.

...९/-

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, मा. सदस्य म्हणतात ते बरोबर नसून, अपघातात जर माणसे मृत पावली तर त्यांचे पुनर्वसन करणे हे शासनाचे कर्तव्य असते. अशा कर्तव्यासाठी शासन कायद्याने बांधलेले आहे.

यावर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे मत मांडले की, जेव्हा उपकरपात्र इमारत कोसळून अपघात होतो तेव्हा अशा तऱ्हेने तत्परता दाखविण्यांत येते का ?

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मा. मुख्यमंत्री आणि मा. गृ. नि. मंत्री महोदय यांनी सदर इमारत पुनर्रचित करण्यांत येईल, असे आश्वासन दिले आहे. तरीही आपणास सदर बाब पुढील बैठकीत ठेवावयाची असेल तरी काही हरकत नाही. ही इमारत पुनर्रचित करण्याबाबत मंत्री मंडळाने निर्णय घेतलेला असून ती बाब धोरण म्हणून करावयाची आहे.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी निदर्शनास आणले की, पृ. क्र. १०७ वर जी भाडेकरूंची यादी देण्यांत आली आहे त्या यादीवर कोणाचीही सही नाही. उद्या जर इमारतीत कोणी घुसले तर त्याला जबाबदार कोण रहाणार?

यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या की, सदर यादी पुन्हा सहिनिशी सादर करण्यांत यावी व अशी अर्धवट माहिती यापुढे देण्यांत येणार नाही, याची काळजी घ्यावी.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आर. सी. सी. स्ट्रक्चर इमारत पडलेली असताना ती आता स्टीलच्या स्ट्रक्चरमध्ये करण्यांत येत आहे. स्टीलच्या स्ट्रक्चरचे आयुष्य किती असणार? कारण आजुबाजूचे वातावरण पहाता, हाऊस गल्लीचे वातावरण पहाता, तसेच सभोवताली तुंबणाऱ्या गुडघाभर पाण्यामुळे आणखी १० वर्षांनी इमारतीची अवस्था अतिशय खराब झालेली असेल.

मुख्य अधिकारी यांनी यावर माहिती दिली की, मा. मंत्री महोदयांनी तज्ञ अभियंत्यांची मंत्रालयात दोनदा बैठक घेऊन इमारतीच्या पुनर्रचनेबाबत विचारविनिमय झालेला आहे. बैठकीस ते स्वत: उपस्थित होते. बैठकीत असे ठरले की, इमारतीकडे जाण्यासाठी जो रस्ता आहे त्या रस्त्याने मटेरियल नेणे शक्य होणार नाही. मा. मुख्यमंत्री महोदय यांची अशी इच्छा आहे की, ही इमारत स्टीलच्या बॉडीने बांधली तर ती लौकर पुनर्रचित होईल. तसेच पडलेली पूनम चेंबर सारखी खाजगी इमारत व शासनाने बांधलेली इमारत या दोघांच्या पुनर्रचनेच्या पध्दतीमधील फरक दिसून येईल. स्टीलने बांधलेल्या

इमारतीचे आयुष्यमान व खर्च व आर.सी.सी.ने बांधलेल्या इमारतीचे आयुष्यमान व खर्च हे जवळजवळ सारखेच असतात.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, इमारत कशाप्रकारे पुनर्रचित करावयाची याबाबत भाडेकरूंचे प्रतिनिधी, मुख्य अधिकारी, मंत्री महोदय आणि तज्ञ व अनुभवी अभियंता यांनी एकत्रित चर्चा करून निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे इमारत ४० वर्षांनी पडेल किंवा कसे याबाबत हमी देणे योग्य होणार नाही.

यावर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, त्या इमारती शेजारीच एक इमारत स्टील स्ट्रक्चरने बांधण्यांत आलेली आहे. परंतु इमारतीची देखभाल व्यवस्थीत होत नसल्याने ते स्टील गंजून जाते. म्हणून मंडळाने इमारत बांधून देण्यापेक्षा भाडेकरूंना सहकारी संस्था स्थापन करून इमारत बांधण्याबाबत कळविण्यांत यावे. म्हणजे पुन्हा इमारतीस अपघात होण्याचा प्रसंग घडला तर त्याची जबाबदारी संस्थेवर येईल, मंडळावर येणार नाही.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे ~~[illegible]~~ स्पष्टपणे निदर्शनास आणले की, सदर इमारत मंडळाची असल्यामुळे ती बांधण्याची वैधानिक जबाबदारी मंडळावर आहे.

मा. सदस्य श्री. तिकोणे यांनी अशी सूचना केली की, गणेश भुवन इमारत पडल्यानंतर रु.१४ लाख खर्च आला आहे. ह्या खर्चामध्ये घोटाळा झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तीन महिने होऊनही करंदीकर समितीचा अहवाल आलेला नाही. तो अहवाल गोपनीय असणार. अहवाल ज्यावेळी बाहेर येईल आणि पुनर्रचनेच्या संदर्भात जी काही मार्गदर्शक तत्वे ठरतील त्यानुरूप सदर इमारत बांधण्यात यावी, जेणेकरून काही चांगले बांधकाम होईल. तसेच काही अंतर्गत फेरबदलांमुळे पुन्हा असे प्रसंग घडू नयेत म्हणून तातडीने इतर पुनर्रचित इमारतींची पहाणी करण्यांत येणार होती, त्याचे पुढे काय झाले अशी विचारणा केली.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, पुनर्रचित इमारतींची पहाणी करून अहवाल मागील बैठकीत देण्यांत आला आहे.

वरील सविस्तर चर्चेनंतर मा. सभापती यांनी करंदीकर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने यापुढे काळजी घेण्यांत येईल, असे आश्वासन ~~देऊन~~ दिले ~~सर्वानुमते सदर प्रस्तावास मंजुरी देण्याचे ठरले.~~ [illegible]

ड]   विषय : इ. क्र. ४०६–४१२, पारशीवाडा, एन्. एम. जोशी मार्ग, ई/द विभाग, प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

....

वरील विषयाची बाब टिप्पणी पृ. क्र. १११ ते १२३ वर सादर करण्यांत आली आहे.

सदर प्रस्तावाची संक्षिप्त माहिती मा. सभापती यांनी दिली. तद्‌नंतर सविस्तर चर्चेअंती विषयांकित योजनेच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

———

ई]   विषय : इ. क्र. २३३, ब, वाळकेश्वर रोड, शिवस्मृती, "डी" विभाग या पुनर्रचित इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

....

वरील विषयाचा प्रस्ताव पृ. क्र. १२५ ते १२९ वर सादर करण्यांत आला आहे.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, गणेशभूवन इमारत पडल्यानंतर मंडळाच्या इतर पुनर्रचित इमारतींची पहाणी केल्यानंतर ज्या पुनर्रचित इमारतींची दुरूस्ती करणे आवश्यक ठरले त्यापैकी उपरोल्लेखित इमारत आहे.

यावर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, पृ. क्र. १२७ वर सदर कामाचे अंदाजपत्रक ७,३३,९४०/- इतके असून पुनर्रचनेसाठी केलेला खर्च मिळून रु. ९,२८,९४०/- इतका आहे. म्हणजे १५–२० वर्षांनी पुन्हा पुनर्रचित इमारतीची दुरूस्ती करण्याची गरज भासली आहे, यावर विचार झाला पाहिजे. दुरूस्तीसाठी प्रति चौ. फू. खर्च पुनर्रचनेची किंमत, भूसंपादनासह रु. ५४०० प्रति चौ. मी. दाखविण्यांत आला आहे. यामध्ये साडेतीन ते चार हजार रूपये दुरूस्तीचा खर्च होत आहे. याचा अर्थ ७० टक्क्यापेक्षा जास्त खर्च पुन्हा करण्यांत येत आहे. थोडक्यात दुरूस्तीसाठी जेवढा खर्च करण्यांत येत आहे तो खर्च पुनर्रचनेसाठी कराव्या लागणा–या खर्चाच्या जवळपास होत आहे. सदर इमारतीची दुरूस्ती केल्यानंतर अधिका–यांच्या म्हणण्यानुसार जर इमारत १०–१५ वर्षांनी पुन्हा पाडावी लागणार असेल तर त्यापेक्षा इमारतीची पुनर्रचनाच करणे योग्य होईल. कारण बांधकाम खर्च पहाता तो प्रति चौ. मी. रु. ४०००/- होत आहे.

यावर उपमुख्य अभियंता श्री. परब यांनी असे निदर्शनास आणले की, इमारत पुनर्रचित करावयाची ठरविले तर इमारत पाडण्यासाठी पुन्हा खर्च करावा लागेल व गाळेधारकांना सं. शि. त पाठवावे लागेल शिवाय आणखी एक ते दीड वर्षांचा कालावधी लागेल.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, स्थानिक आमदार, नगरसेवक यांनी सदर इमारत पुनर्रचित न करता दुरुस्ती करण्यांत यावे अशी मागणी केलेली आहे.

उपमुख्य अभियंता श्री. परब यांनी मा. सदस्य श्री. उसपकर यांनी विचारणा केल्यानुसार माहिती दिली की, पॉलीमर नावाचे केमिकल वापरण्यात येणार असून या केमिकलमुळे इमारतीचे आयुष्य वाढण्यास मदत होते. सदर केमिकल "सुनंदा केमिकल्स कं." हे तयार करणार असून त्यांच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे काम करण्यांत येणार आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, गणेश भुवन इमारत पडल्यानंतर शासनाने इतर पुनर्रचित इमारतीची पहाणी करण्याचे आदेश दिले होते व त्याप्रमाणे पहाणी केल्यानंतर ४–५ इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे दिसले. दुरुस्तीसाठी खर्च आवश्यक असून प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यांत आले आहेत. इमारतीचा खर्च कमी कसा होईल याबाबत चर्चा व्हावी परंतु इमारतीची दुरुस्ती करु नये असे म्हणणे गैर आहे. कारण उद्या जर इमारत पडली तर काय?

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी सूचना केली की, या इमारतीत फक्त १० भाडेकरु आहेत. इमारतीच्या पुनर्रचनेसाठी किती खर्च येईल व दुरुस्तीसाठी किती खर्च येईल याबाबत माहिती काढून ती भाडेकरुंना कळविता येईल. जर पुनर्रचनेसाठी कमी खर्च येणार असेल तर भाडेकरुंची संख्या कमी असल्यामुळे इमारत लौकरच पुनर्रचित होऊ शकेल. म्हणून सदर प्रस्ताव मंजूर न करता दुरुस्ती व पुनर्रचनेच्या दृष्टीकोनातून माहितीनिशी पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यांत यावा. म्हणजे इमारतीची दुरुस्ती करावयाची की पुनर्रचना करावयाची हे ठरविता येईल.

यावर मुख्य अधिकारींयांनी उपमुख्य अभियंता [पुनर्र] श्री. परब यांना अशा सूचना दिल्याकी, मा. सदस्यांनी सूचविल्याप्रमाणे त्यांनी मा. सदस्यांसोबत इमारतीस भेट देऊन भाडेकरुंची बैठक घेऊन त्यांचे मत विचारात घेऊन प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याबाबत कार्यवाही करावी.

....१३/-

मा. सभापती यांनी मा. सदस्यांनी प्रस्तावात निर्माता या शब्दाबाबत घेतलेल्या आक्षेपाबाबत असे मत व्यक्त केले की, प्रस्तावात चुकीचा मराठी शब्द वापरला गेल्यामुळे चर्चेमध्ये अडचण निर्माण झाली. विशिष्ट निर्माता डोळ्यासमोर ठेऊन सदर प्रस्ताव ठेवण्यांत आला आहे असा मा. सदस्यांचा गैरसमज झालेला आहे. त्याबाबत खुलासा करावा अशा सूचना त्यांनी श्री. परब यांना दिल्या असता श्री. परब यांनी खुलासा केला की, विशिष्ट निर्माता डोळ्यासमोर ठेवून प्रस्ताव सादर करण्यांत आलेला नाही. यावर मा. सभापती यांनी तसे नसेल तर तो शब्द काढून टाकावा व स्पष्ट उल्लेख करण्यांत यावा की, "खास प्रकारचे केमिकल".

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी सूचना केली की, या इमारतीचा दुरुस्ती व पुनर्रचनेच्या दृष्टीकोनातून विचार करुन तुलनात्मक तक्ता पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा व त्यावर विचार करण्यांत यावा.

मुख्य अधिकारी यांनी असे सुचविले की, त्या इमारतीतील लोकांची काय इच्छा आहे त्याबाबत ही माहिती घेऊन ती पुढील बैठकीत ठेवण्यांत यावी, म्हणजे लोकांचे मतही विचारात घेता येईल.

चर्चेच्या ओघाओघात उपमुख्य अभियंता श्री. वणिकर यांनी असे निदर्शनास आणले की, इ. क्र. १०-१२ रोपालेन या इमारतीची जुजबी दुरुस्ती करण्यांत आली होती. या इमारतीच्या कॉलमला काही तडे गेलेले आहेत. त्यामुळे या इमारतीस तांतडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. गणेश भुवन इमारत पडल्यानंतर करण्यांत आलेल्या पुनर्रचित इमारतींच्या सर्वे मध्ये ४ इमारतींची दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे दिसून आले. सदर इमारत ही समुद्राच्या काठावर असून त्या इमारतीची अवस्था धोकादायक आहे. रोपालेन येथील पुनर्रचित इमारतीत मंडळाचे कार्यालय आहे. इमारतीच्या भाडेकरुंचे मत विचारात घेतले तरी काही निष्पन्न होईल असे वाटत नाही. सदस्यांच्या समजुतीप्रमाणे विशिष्ट निर्माता डोळ्यासमोर ठेऊन दुरुस्ती करण्यांत येणार नाही. बांधकामक्षेत्रात नवीन नीवन तंत्रज्ञान येत असून ते प्रयोगात्मक रुपाने वापरण्यांत येत असते. त्याप्रमाणेच सुनंदा केमीकलचे डॉ. मांजरेकर हे नामांकित स्ट्रक्चरल इंजिनीयर असून त्यांची लिटरेचर तयार केले आहे. त्यांचे स्वत:चे पेटंट आहेत त्या पेटंटचे त्यांनी स्पेसिफिकेशन केलेले आहे व ते ब-याच ठिकाणी वापरण्यांत आलेले आहे. म्हणून त्या उद्देशाने प्रस्तावात निर्माता हा शब्द वापरण्यांत आला आहे तो बरोबर आहे. नवीन तंत्राचे पेटंट असतील तर ते वापरावयास हरकत नाही.

मा. सदस्य श्री. तीकोने यांनी असे निदर्शनास आणलेकी, जेव्हा आपण इमारत दुरुस्तीस घेतो तेव्हा स्थानिक लोकांशीही आपण बोलत असतो. त्यामुळे इमारत दुरुस्ती करावी की, पुनर्रचना करावी याबाबतचे भाडेकरूंचे मत घेतले जात नाही. यावर मा. सभापती यांनी तशी पध्दत नसून रहिवाशांचे काय म्हणणे आहे हे टिप्पणीमध्ये येत नाही. कारण प्रस्ताव हा अधिकृतपणे आलेला असतो, असे सांगून माहिती दिली की, गणेश भुवन पडल्यानंतर इतर पुनर्रचित इमारतींची पहाणी करण्याचे आदेश देण्यांत आले होते. त्यानंतर मुख्य अभियंता[२], श्री. करंदीकर व इतर अधिका-यांनी पहाणी केल्यानंतर दोन-तीन पुनर्रचित इमारतींची दुरुस्ती त्वरित करणे आवश्यक असल्याचे दिसून आले. मा. सदस्यांनी सुचविल्या-प्रमाणे जर अशा इमारतीतील लोकांनी इमारत दुरुस्ती करण्यांत येऊ नये असे मत दिले तरी शासन म्हणून कर्तव्य असते की, इमारतीतील माणसे मरू नयेत म्हणून त्या इमारतीची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेणे. सदस्यांच्या मताप्रमाणे रहिवाशांचे म्हणणे आयटेममध्ये येत नाही.

यावर उपसचिव श्री. कोकणे यांनी मा. सदस्य श्री. गणेश तिकोने यांनी जो "लोकांचा सहभाग" बाबत मत व्यक्त केले त्या मताशी सहमती दर्शवून मंडळाची पुनर्रचित इमारतीतील लोकांची जबाबदारी ही उपकरपात्र इमारतीतील लोकांपेक्षा जास्त आहे. मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे इमारतीच्या दुरुस्तीसाठी किंवा पुनर्रचनेसाठी किती खर्च व वेळ लागेल याबाबत तुलनात्मक माहितीवर विचार होणे आवश्यक आहे.

यावर मा. सभापती यांनी असे स्पष्ट मत मांडले की, मंडळासमोर एकदा प्रस्ताव आला की, त्यावर सर्वानुमते निर्णय द्यावयाचा असतो. प्रस्ताव मंजूर करावयाचा झाल्यास मंजूर करावा किंवा प्रस्तावात काही सुधारणा करून मंजूर करावयाचा झाल्यास त्याप्रमाणे सुधारणा करून प्रस्ताव मंजूर करावा. परंतु बैठकीत ठेवण्यांत आलेला आयटेम हा नियमाने ठेवण्यांत आलेला असतो दुरुस्तीसाठी व पुनर्रचनेसाठी जर खर्च जवळजवळ सारखाच होत असेल तर रहिवाशांना इमारतीची दुरुस्ती करून पाहिजे की पुनर्रचना करून पाहिजे हे विचारून तसा प्रस्ताव मंजूर करावयास हरकत नाही. परंतु पूर्णपणे विषय रहिवाशांना विचारा असे होत नाही. नियम हे शासकीय यंत्रणा करते ते लोकाना विचारून केले जात नाहीत व यंत्रणेनेच नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

मा. सदस्य श्री. सावरकर यांनी असे मत मांडले की, हे प्रस्ताव पुन्हा पाठविताना इमारतीची स्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे. त्याचबरोबर त्या इमारतीत असणा-या मंडळाच्या कार्यालयाचाही विचार केला पाहिजे.

मा. सदस्य श्री. मोडक यांनी असे मत व्यक्त केले की, मुख्य अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे स्थानिक सदस्य आणि मंडळाचे अधिकारी यांनी एकत्रित इमारतीस भेट देऊन पहाणी करावी व पहाणीमध्ये असे आढळले की, इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक असेल तर दुरुस्ती करण्यासाठी प्रस्ताव ठेऊन तो मंजूर करावा. ~~परंतु~~ किंवा इमारतीची पुनर्रचना करणे आवश्यक असेल तर ~~हा~~ तसा प्रस्ताव ~~पुढे ढकलण्यांत यावा~~ सादर व्हावा.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, सदर प्रस्ताव पुढे ~~ढकलावयास~~ टाकलावयास हरकत नाही. परंतु तज्ञ अभियंत्यांनी जर इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे मत दिले असेलतर त्याबाबत शंका घेऊन इमारतीची पहाणी करणे बरोबर वाटत नाही. इमारतीच्या दुरुस्तीसाठी किती खर्च ~~येतो~~ घेतो व पुनर्रचनेसाठी किती खर्च होईल ही माहिती घेण्यासाठी प्रस्ताव पुढे ढकलण्यांत यावा हे सदस्यांचे म्हणणे रास्त आहे. परंतु व्यवहारीक तत्वाप्रमाणे आपण अभियंत्यांचे ऐकले पाहिजे कारण त्यांना शासनाने अभियंता म्हणून नेमलेले असते.

वरील प्रदिर्घ चर्चेनंतर इ. क्र. २३३, ब, वाळकेश्वर रोड, शिवस्मृती इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव पुढे ढकलून सदर प्रस्तावाच्या चर्चेमध्ये सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याबाबतच्या उत्तरासह प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याचे सर्वानुमते ठरले.

३] विषय : इ. क्र. १०-१२, रोघा लेन, चंदनवाडी सी विभाग या पुनर्रचित इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

वरील विषयाचा प्रस्ताव पृ. क्र. १३१ ते १३५ वर सादर करण्यांत आला आहे.

उपमुख्य अभियंता श्री. परब यांनी माहिती दिली की, इमारतीची अवस्था अतिशय खराब असून दर चौ.मी. संभाव्य खर्च रु. २७७४/- इतका आहे. इमारतीमध्ये तीनच भाडेकरु असून बाकीचे मंडळाचे कार्यालय आहे. त्यामुळे इमारतीचा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, सर्व सन्मा. सदस्यांच्या मताप्रमाणे सदर प्रस्ताव पुढे ढकलण्याचा निर्णय झालेला असल्यामुळे सदर, प्रस्ताव पुढे ढकलण्यांत यावा.

चर्चेनंतर सदर प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्याचे ठरले.

ऊ] विषय : नौशिर भरूचा मार्ग, १६, जी. ट. के. चिखलवाडी विभाग डी जवळ समाजमंदीर बांधण्यास परवानगी देणेबाबत.

....

उपरोल्लेखित प्रस्ताव पृ. क्र. १३७ ते १३९ वर सादर करण्यांत आला आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, कलेक्टरने समाज मंदीर बांधण्यास परवानगी दिली असून आमदार निधीतून समाज मंदीर बांधण्यांत येणार आहे.

वरील प्रस्तावाच्या चर्चेच्या वेळी सर्वानुमते असे ठरले की, सदर बाबत संबंधित विभागामार्फत स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यांत यावा व प्राधिकरणाने मंजूरी दिल्यानंतर संबंधितांना तसे कळवावे.

ए] विषय : इ. क्र. ६०२-६१०, सकिना मंझील, ना. म. जोशी मार्ग, इ विभाग या इमारतीचे म्हाड अधिनियम कलम ८८[३] ब अन्वये भूसंपादन करणे.

....

उपरोक्त विषयाचा प्रस्ताव पृ. क्र. १३९ अ ते १३९ ई वर सादर करण्यांत आला आहे.

उ. मु. अ. [पुनर्] श्री. परब यांनी वरील प्रस्तावाची संक्षिप्त माहिती सभागृहास दिली.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ४८/३७८

पुनर्बांधणी विभागातील खालील प्रस्तावांवर प्रदिर्घ चर्चा होवून सविस्तर चर्चेअंती सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व हरकतीच्या आधारे निर्णय घेण्यांत आ[ले]

अ] इमारत क्र. ९३ डी, सनमिल लेन, लोअर परेल, मुंबई या पुनर्रचित इमारतीस रहिवाशांनी एक मताने ठरविलेले "शामसुंदर सदन" हे नाव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

ब] इ. क्र. ३३४-३३६, "आमची सावली", ना. म. जोशी मार्ग, ग/द विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे नवीन इमारत बांधण्यासाठी रु. १,०९,७९,६९२/-[भू संपादनासहीत] अंदाजीत रक्कमेस सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते प्रशासकिय मान्यता देण्यांत आली.

क] इ.क्र. ३३४-३३६, "आमची सावली" ना.म.जोशी मार्ग, ग/दर्क्षिण विभाग येथील नियोजित इमारतीच्या पुनर्बांधणी कामाच्या निविदा मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन सविस्तर चर्चेअंती प्रथम निम्नतम निविदेचे ठेकेदार मे. अश्वीना कन्स्ट्रक्शन यांनी मुळ निविदा रक्कमेच्या ८.४० टक्के जास्त भरलेल्या निवीदेस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

ड] ३६, बी, चंपागल्ली, काळबादेवी, "सी" विभाग गणेश भुवन इमारतीच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर पुनर्बांधणीच्या योजनेच्या एकूण अंदाजित रु. ५८,४३,८०४/- इतक्या खर्चास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली तसेच दुर्घटनाग्रस्त इमारत तोडण्यास आलेल्या खर्चाबाबत मु.अ./दु.ब.पु. यांनी पहाणी करुन निर्णय घेण्याचे सर्वानुमते ठरले.

इ] इ.क्र. ४०६-४१२, पारशीवाडा, एन. एम. जोशी मार्ग, जी/द विभाग या मालमत्तेच्या पुनर्बांधणी योजनेस महानगरपालिकेच्या मंजूर नकाशाप्रमाणे रु. ५५,७८,३०८/-[भूसंपादनासहित] अंदाजित रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

ई] इ.क्र. २३३, वाळकेश्वर रोड, शिवस्मृती, डी. विभाग या पुनर्रचित इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबतच्या प्रस्तावाबर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती सन्मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सूचना/हरकती तसेच मा. सदस्यांची भेट आयोजित करुन सविस्तर अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे सर्वानुमते ठरले व प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला.

उ] इ.क्र. १०-१२, रोघा लेन, चंदनवाडी, सी. विभाग या इमारतीच्या दुरुस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबतच्या प्रस्तावाबर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सूचना/हरकतींबाबत तपशीलवार अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याचे सर्वानुमते ठरले व प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला.

ऊ] नौशिर भरुचा मार्ग, १६जी. टू के. चिखलवाडी, विभाग "डी" जवळ समाज मंदीर बांधण्यास परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते सदर प्रस्तावास मंजूरी देऊन सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागामार्फत प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

ए] इ. क्र. ६०२-६१०, सकीना मंझील, ना. म. जोशी मार्ग, "ई" विभाग, या इमारतीत म्हाडा अधिनियम, कलम ८८[३] "ब" अन्वये भू संपादन करण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

बाब क्र. ४८. ३

उपमुख्य अधिकारी [सं. गा.]

अ] विषय : सं. शि. तील दि. ३०. ९. ९७ पर्यंत रिक्त/घुसखोर गाळ्यांची माहिती दर्शविणारा तक्ता.

उपरोल्लेखित तक्ता सर्व सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी पृ. क्र. १४१ ते १४३ वर सादर करण्यांत आला आहे.

मा. सदस्य श्री. भूवड यांनी तक्त्यातील शे-यामध्ये "बंद" बाबत खुलासा करावा अशी विनंती केली असता उ. मु. अ. श्री. पाटील यांनी माहिती दिली की, तपासणीमध्ये काही गाळे बंद आढळतात म्हणून त्या गाळ्यांची पुन्हा तपासणी केली जाते. दुस-या तपासणीच्यावेळीही ते गाळे बंद आढळतात. म्हणून शे-यामध्ये बंद असा उल्लेख करण्यांत आला आहे.

तक्त्यातील "बरोबर" या शे-याबाबत मा. सदस्य श्री. भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, मुळ भाडेकरू त्याला मिळालेल्या पर्यायी गाळ्यात पोटभाडेकरू ठेवतो. जेव्हा तपासणी होणार असे त्याला समजते तेव्हा मुळ भाडेकरू स्वत: गाळ्यात हजर रहातो. म्हणून "बरोबर" हा शेरा दिला जातो. परंतु काही वेळा मुळ भाडेकरू गाळ्यात हजर राहू शकत नाही, अशावेळी पोटभाडेकरूस तो गाळा बंद करून जाण्यास सांगतो. त्यावेळी "बंद" असा शेरा दिला जातो व हे प्रकार ते स्वत: सं. शि. त रहात असल्यामुळे त्यांना माहिती झालेले आहेत असे सांगून गाळ्यांची तपासणी होण्यापूर्वी संबंधित गाळेधारकांना कळते.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी सुचविले की, जर गाळा बंद आढळला तर दरवाजावर कागद चिकटवून सदर गाळ्याची पुन्हा अमुक तारखेस तपासणी करण्यांत येणार आहे अशी भाडेकरूस सूचना देण्यांत यावी.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, भाडेवसुलीकारांना अशा सूचना देण्यांत आल्या आहेत की, दुस-या तपासणीमध्ये जर गाळा बंद आढळला तर गाळ्याचे टाळे तोडून गाळ्यात अनधिकृत माणूस रहात असेल तर पंचनामा करून ~~सामानजप्त~~ सामान उचल करावे.

...१९/-

मा. सदस्य श्री. भुवड यांनी असे मत व्यक्त केले की, मुळ भाडेकरु पोटभाडेकरु-कडून हजारो रुपये डिपॉझीट घेऊन भाडयाने गाळा देतो व मंडळ मात्र रु. ३५/- सेवाशुल्कापोटी घेते. त्यामुळे मंडळाचा महसुल फुकट जात आहे. म्हणून अनधिकृत व्यक्ती रहाताना आढळल्यास ती रहात असलेल्या दिवसापासून त्यांच्याकडे दंडात्मक रु. ६००/- दरमहीना घेण्यांत यावी.

यावर मा. सदस्य श्री. सावरकर यांनी असे मतमांडले की, जर दरमहिना रु. ६००/- अनधिकृत व्यक्तीकडून दंडात्मक रक्कम घेतली तर त्या अनधिकृत व्यक्तीस एकप्रकारे कायदेशीर मान्यता दिल्यासारखेच होईल.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, जो अनधिकृतपणे रहात असतो त्याला गाळयाबाहेर काढण्याची नोटीस देऊन जेव्हापासून तो रहातो तेव्हापासून त्याच्याकडून द. म. रु. ६००/- घ्यावयाचे आणि रु. ६००/- द. म. प्रमाणे रक्कम घेतल्यावर त्याला गाळयाबाहेर काढण्यात येते अशी पध्दत आहे.

मा. सदस्य श्री. मोडक यांनी विचारणा केली की, पोटभाडेकरुस गाळयातून बाहेर काढल्यानंतर त्या गाळयाचा ताबा मुळ भाडेकरुंना मिळणार कि नाही?

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, पोटभाडेकरुस गाळयातून बाहेर काढल्यानंतर त्या गाळयाचा ताबा पुन्हा मुळ भाडेकरुस दिला जात नाही परंतु पुनर्रचित इमारतीतील गाळा मिळण्याचा त्याचा हक्क मात्र कायम ठेवला जातो.

मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत असे मत व्यक्त करण्यांत आले होते की, जे लोक संक्रमण गाळे विकत घेऊन रहात आहेत त्यांच्या नांवावर ते गाळे हस्तांतर करुन देण्यांत यावेत अशी त्यांची विनंती आहे. ते पैसे भरावयासही तयार आहेत. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, पुनर्रचित इमारतीतील गाळे दंडात्मक रक्कम घेऊन गाळेधारकांच्या नांवे नियमित केले जातात तसेच संक्रमण गाळे वारसदारांच्या नांवे करुन देण्याचे आदेश देण्यांत आले आहेत. संक्रमण गाळे विकत घेणा-या व्यक्तीने पुनर्रचित इमारतीतील गाळयाच्या वितरणाच्या वेळेस मुळ भाडेकरुस समोर आणले आणि प्रतिज्ञापत्र करुन आवश्यक ते दंडात्मक रक्कम भरली तर त्याच्या नांवे गाळा नियमित केला जातो. त्याचा अधिकार डावलला जात नाही.

मा. सदस्य श्री. मोडक यांनी पुनर्रचित गाळयाप्रमाणेच संक्रमण गाळे विकत घेणा-या व्यक्तींच्या नांवे गाळे केल्यास बृहतसूची कमी होईल असे मत व्यक्त केले. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, रितसरपणे संक्रमण गाळा विकत घेणारी व्यक्तीस जरी मुळ भाडेकरुने त्याच्या गाळयाचा अधिकार दिला असला ~~तरी संक्रमण~~ ~~शिबिरातील गाळयाचा ताबा~~ [illegible] घेत नाही. कारण भूसंपादन अधिका-यांनी

प्रसिध्द केलेल्या भाडेकरूंच्या यादीत मुळ भाडेकरूचे नांव असते. त्यामुळे पुनर्रचित गाळयाचा ताबा मुळ भाडेकरू घेणार व त्यांच्याकडून संक्रमण गाळा विकत घेणारी व्यक्ती मंडळाकडे तो गाळा त्याच्या नावे नियमित करण्या-साठी अर्ज करणार व नंतर दंडात्मक रक्कम भरून घेऊन तो त्यांच्या नांवे नियमित केला जातो अशी पध्दत आहे.

यावर मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, काहीवेळा असे होते की, संक्रमण गाळा विकत घेऊन २०-२५ वर्षे ती व्यक्ती रहात असते परंतु मुळ भाडेकरू मृत पावतो अशाप्रकरणी कोणती कारवाई करण्यात येते. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, अशा व्यक्तींकडून दंडात्मक रक्कम घेऊन नियमाप्रमाणे पुनर्रचित इमारतीमध्ये गाळा नियमित केला जातो.

मा. सदस्य श्री भुवड यांनी निदर्शनास आणले की, चाळीची दुरूस्ती पूर्ण होऊनही काही भाडेकरू संक्रमण शिबीरात रहात आहेत अशा लोकांची यादी देण्यात येणार होती. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, संबंधित कार्यकारी अभियंता यांना आदेश देण्यात आले आहेत की, चाळीची दुरूस्ती पूर्ण झाल्यानंतर त्यांनी तसे संक्रमण शिबीर कार्यालयास कळवावे व त्यानंतर संक्रमण शिबीरातील गाळे खाली करून घेण्यात यावेत.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे निदर्शनास आणले की, पुनर्रचित गाळे विभागाची या बैठकीत माहिती देण्यात आलेली नाही. मागील बैठकीत पुनर्रचित गाळयांबाबत न्यायालयीन प्रकरणाची परिस्थिती काय आहे याबाबत माहिती मागविण्यात आली होती. आजच्या बैठकीत तसा अहवाल आलेला नाही.

मा. सभापती यांनी विधी शाखेच्या कामाबाबत नाराजी व्यक्त करून मुख्य अधिकारी यांना विनंती केली की, त्यांनी विधी सल्लागार यांना सूचना द्याव्यात की, कोणत्या न्यायालयात किती प्रकरणे चालू आहेत व त्याबाबत काय निपटारा झाला आहे इत्यादी बाबत माहिती देण्यात यावी.

~~इतर बाबी~~ :-

~~बाब क्रमांक :- ९६/४~~

~~(अ) विषय- अंधजुला टेलिफोन बुथ टाकण्यासाठी~~

....२१/-

उत्तर परिमंडळ :-
+++++++++++

बाब क्रमांक : ४८/४.

[अ] विषय- अपंगाला टेलिफोन बुथ टाकण्यासाठी प्रतिक्षानगर, सायन येथील बैठी चाळ क्र. क्र. सी/१ च्या बाजूला ६ x ६ ची जागा जागा मंजूर करण्याबाबत.

वरील विषयाचा प्रस्ताव पृ. क्र. उ-१ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, सदर अपंग व्यक्तीचे दोन्ही पाय गेलेले असून अधिकृत संस्थेत नांव नोंदविलेले आहे व संस्थेच्या नियमाप्रमाणे जागा देण्यात येत आहे तसेच दरमहा त्या व्यक्तीकडून ठरलेले आकार घेण्यात यावेत., वरील प्रस्ताव मंजूर करून तो मुंबई मंडळाची जागा असल्यामुळे त्यांच्याकडे तो पाठविण्यात यावा म्हणजे मुंबई मंडळ अंतिम निर्णय घेईल.

वरील चर्चेनंतर सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

[ब] विषय- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरूस्तीच्या कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूर प्रदान करणेबाबत.

उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे-बाबतचे प्रस्ताव पृ. क्र. उ-१अ ते १३७ वर सन्मा. सदस्यांच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

उत्तर परिमंडळातील प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सदस्य श्री उसपकर यांनी पृ. क्र. उ-२३ वरील संघवी भुवन या इमारतीच्या प्रस्ताव-बाबत विचारणा केली की, सदर इमारतीचे काम ९५ साली झालेले असताना आता पुन्हा ९७ साली काम का करण्यात येत आहे? यावर संबंधित अधिकारी श्री भुवनदास यांनी खुलासा केला की, ठेकेदाराचा दर कमी असल्याने होते. त्याने मंजूर नकाशाप्रमाणे काम पूर्ण केलेले आहे. व पुढील

वाढीव काम करण्यास तो तयार नाही म्हणून नवीन अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे निदर्शनास आणले की, वास्तुशास्त्रज्ञ काय खुलासा करीत होते याची माहिती देण्यात येत नव्हती. परंतु आता तशी माहिती देण्यात आली असून वास्तुशास्त्रज्ञाने स्वत:ची चुक कबूल केलेली आहे. तरी आता त्या वास्तुशास्त्रज्ञावर काय कारवाई करण्यात येईल ? यावर संबंधित अधिकारी श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, क्षेत्रफळातील फरक जर जास्त असेल तर त्या वास्तुशास्त्रज्ञाला ब्लॅक लीस्टेड करतो व क्षेत्रफळातील फरक कमी असेल तर त्याला वॉर्निंग नोटीस देण्यात येते. वरील चर्चेनंतर सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

इ. क्र. ११, देवधा मंझील, शिवाजी पार्क रोड, क्र. ३, दादर [प.] बाबतचा प्रस्ताव प्र. क्र. ड-२०१ वर मागील बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी व मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन व नोंद घेऊन अंदाजपत्रक मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली.

ठराव क्रमांक : ४८/३७९.

[अ] अपंगाला टेलिफोन बुथ टाकण्यासाठी प्रतिक्षानगर, सायन येथील बैठे चाळ क्र. सी-१ च्या बाजूला ६x६ ची जागा मंजूर करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली तसेच दरमहा अर्जदारांकडून ठरलेला आकार घेण्यात यावा तसेच सदर प्रस्तावास ~~प्राधिकरणाची~~ मंजूरी आवश्यक असल्याने मंडळाने मंजूर केलेला प्रस्ताव संबंधित विभागामार्फत ~~प्राधिकरणाकडे~~ पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ब] उत्तर परिमंडळातील परिशिष्ट "अ" मधील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना व नकाशांना सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सूचना व हरकतींच्या आधीन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

~~ठराव क्रमांक : ४८/३८०~~

दक्षिण परिमंडळ :-

बाब क्रमांक : ४८.५

[अ] विषय- इ. क्र. ३५,बी,मुगभाट क्रॉस लेनच्या दुरूस्ती कामाबाबत.

वरील विषयाचा प्रस्ताव पृ.क्र. द-१ वर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाची माहिती उपमुख्य अभियंता [द.] यांनी सभागृहास दिली.

सविस्तर चर्चेअंती सदर इमारतीच्या दुरूस्तीचा प्रस्ताव मंजूरीसाठी पुढील बैठकीत ठेवण्यास तसेच दरम्यानच्या काळात ८८[३]अ प्रस्ताव मागे घेण्यास मंजूरी देण्यात आली.

[ब] [१] विषय- इ. क्र. ३८२,अे. बी. मौलाना शौकत अली रोड ह्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

उपरोक्त विषयाचा प्रस्ताव पृ.क्र. द/१ ते द-३ वर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाची माहिती उपमुख्य अभियंता [द.] श्री वनीकर यांनी सभागृहास दिली.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते प्रस्तावित केल्यानुसार मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मान्यता देण्याचे ठरले.

[२] विषय- इ. क्र. ३१,पारेख स्ट्रीट ह्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

उपरोक्त विषयाचा प्रस्ताव पृ.क्र. द-५ ते द-९ वर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाची संक्षिप्त माहिती उपमुख्य अभियंता [द.] श्री वनीकर यांनी सभागृहास दिली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती

सर्वानुमते प्रस्तावित केल्यानुसार मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मान्यता देण्याचे ठरले.

[क] विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्ती कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्ती कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्या-बाबतचे प्रस्ताव पृ.क्र. द-९ ते द-१७७ वर सादर करण्यात आले आहेत.

पृ.क्र. द-३३ वरील इ.क्र. ४९-५१, कुलाबा रोड इमारतीच्या प्रस्तावाबर चर्चा करताना मा. सदस्य श्री उसपकर यांनी विचारणा केली की, मधल्या काळाचा उपकर भरण्यात न आल्याबाबत महानगरपालिकेने काही कारवाई केली आहे का? याबर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणाले की, महानगरपालिकेबाबत जे काही मुद्दे बैठकीत उपस्थित केले जातात त्याबाबत माहिती/खुलासा पुढील बैठकीत देण्यात यावा असे मागील बैठकीत ठरले होते. त्याप्रमाणे माहिती सादर करण्यात आली आहे का? याबर सदर माहिती आणण्यात आली असल्याचे महानगरपालिके-च्या संबंधित अधिका-याने सांगितले.

श्री वणीकर, उपमुख्य अभियंता [द.] यांनी माहिती दिली की, सप्टेंबर-८८ ते मार्च-८९ या कालावधीचा रु. ४२,६१८/- करापोटी भरलेले नाहीत. बाकी दुरुस्ती उपकर पूर्ण भरलेला आहे.

वरील चर्चेनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ.क्र. द-५५ वरील १७६-१८०, पी. एन. स्ट्रीट, या इमारतीच्या प्रस्तावाबर चर्चा करताना मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणाले की, सदर इमारतीत अनिवासी गाळे जास्त असल्यामुळे एन.ओ.सी. साठी काही प्रयत्न करण्यात आले आहेत का? याबर अधिकारी श्री वनीकर यांनी माहिती दिली की, रहिवाशांना एन.ओ.सी. घेण्यासाठी आग्रह केला होता. त्याप्रमाणे त्यांनी एन.ओ.सी. घेतली व इमारतीचा जो भाग धोकादायक होतो तोभाग तोडल्यानंतर त्यांनी कळविले की, रहिवाशांमध्ये एकजूट होत नसल्यामुळे मंडळानेच काम करुन यावे. वरील माहितीनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ.क्र.द-६१ वरील ४५, जंजीकर स्ट्रीट या इमारतीच्या प्रस्तावाबाबत उ.मु.अभि. यांनी माहिती दिली की, सदर इमारतीचा उपकर १९९० पर्यंत भरलेला आहे हे खरे आहे. सदर इमारत ही कोपऱ्यावरची असून या इमारतीच्या बाजूचा दुसरा रस्ता ३७-३९, रघुनाथ महाराज मार्गवरील इमारत आहे ती दुरुस्त करण्यात आली होती. या इमारतीच्या दुरुस्तीच्या पुस्तिकेमध्ये नोंद आहे ती ३७ आणि ५१ पर्यंतच आहे. परंतु ३७, ४१ हा भाग फक्त ४५, जंजीकर स्ट्रीटमध्ये आहे आणि दुसरा जो भाग आहे तो ४१-५१ ह्या शेजारच्या इमारतीचा आहे. त्यांच्या दप्तरी ३७-५१ अशी नोंद असल्यामुळे या इमारतीला दुरुस्ती करावी लागेल. म्हणून या लोकांनी उपकर भरलेला नाही. वास्तविक ही इमारत दुरुस्त झालेली नाही. कारण याबाबत मंडळाने महानगरपालिकेशी पत्रव्यवहार केलेला असून महानगरपालिका मंडळाच्या मताशी सहमत आहे. वरील माहितीनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ.क्र.ब-८३ वरील प्रस्तावाबर चर्चा करताना मा.सदस्य श्री उसपकर यांनी सूचना केली की, अधिकची रक्कम भरण्याबाबत भाडेकरूंना पैसे भरण्याबाबत कळविले आहे. तरीही त्यांनी पैसे भरलेले नाहीत. म्हणून त्यांना स्मरणपत्रे पाठवून पैसे भरण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा.

पृ.क्र.द-९१ वरील प्रस्तावाबाबत मा.सदस्य श्री उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, अधिकची रक्कम भरपूर असून जर भाडेकरू ती भरत नसतील तर ८८(३) अंतर्गत जाहीर करण्यात यावे. मा.सभापती यांनी असे सुचविले की, अशाप्रकरणी आवश्यक तेवढीच दुरुस्ती करून घेण्यात यावी. अधिक भरावयाची रक्कम रहिवाशी काही कारणांमुळे भरत नाहीत. मंडळाच्या नियमाप्रमाणे स्ट्रक्चरल दुरुस्ती, डब्ल्यु.सी., धोकादायक जीना वगैरे केली जाते. मग लोक खोटया तक्रारी करतात की, त्यांची इमारत अर्धवट दुरुस्त करण्यात आली आहे. म्हणून त्यांच्याकडून लिहून घेण्यात यावे की, अधिक भरावयाची रक्कम भाडेकरू भरू शकत नसल्याने आवश्यक तेवढीच दुरुस्ती करण्यास त्यांची तयारी आहे. वरील चर्चेनंतर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ.क्र.द-९५ वरील २२-३४, बनियन स्ट्रीट या इमारतीच्या प्रस्तावाबर चर्चा करताना मा.सदस्य श्री उसपकर यांनी निदर्शनास आणले की, तिन्ही टप्प्यांच्यावेळी क्षेत्रफळात फरक आहे. त्यावर खुलासा करताना श्री वनीकर, उ.मु.अभि. यांनी माहिती दिली की, मागील टप्प्यात बा बाल्कनीचा भाग समाविष्ट करण्यात आला नव्हता. आता बाल्कनीचा ५० टक्के भाग घेण्यात आला असल्यामुळे क्षेत्रफळ वाढलेले दिसते. वरील चर्चेनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

९१

पृ. क्र. द-१०१ वरील इ. क्र. १४२-१४४, अब्दुल रहेमान स्ट्रीट या इमारतीच्या प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री उसपकर यांनी निदर्शनास आणले की, इमारतीचे वास्तुशास्त्रज्ञ श्री चेंबूरकर यांच्याबाबत ब-याचशा तक्रारी येत असतात. ते एक ब्लॅक लिस्टेड वास्तुशास्त्रज्ञ आहेत. सदर इमारतीस मा. सदस्यांनी भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. यावर संबंधित अधिकारी श्री वनीकर यांनी माहिती दिली की, त्यांनी स्वत: सदर इमारतीची पहाणी केली तसेच श्री वास्तुशास्त्रज्ञ श्री चेंबूरकर यांना बदलण्यात आले आहे. वरील चर्चेनंतर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. द-१३१ वरील इ. क्र. ३३४-३४२ च्या प्रस्तावाबाबत मा. सदस्य श्री उसपकर यांनी सदर इमारतीस भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. यावर उ. मु. अभि. श्री वनीकर यांनी माहिती दिली की, प्रस्तावात जरी पहिला टप्पा सुधारित असे म्हटले असले तरी पहिल्या टप्प्याचे काम झालेले नाही. त्यामुळे ते करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव इमारतीस भेट देण्याच्या अटीसह मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. द-१३३-अ वरील इ. क्र. ८६, वाळकेश्वर रोड या इमारतीच्या प्रस्तावाबाबत उ. मु. अभि. [द.] यांनी माहिती दिली की, सदर प्रस्ताव मागील बैठकीत ठेवण्यात आला होता. परंतु तो पुढे ढकलण्यात आला होता. आता अंदाजपत्रकाची तपासणी करण्यात आली असून वाढीव दोन मजल्यांबाबत महानगरपालिकेकडून रेकॉर्ड प्राप्त झालेला आहे. सन १९६४ मध्ये " रहिवास दाखला" मिळालेला असून तेस बिलामध्ये "अ" कॅटेगरी आहे. वरील दोन मजले हे रितसर बांधलेले असल्यामुळे दुरुस्तीसाठी घेण्यास हरकत नाही. वरील माहितीनंतर सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. द-१६७ वरील इ. क्र. ३४३, बी. डी. काळबादेवी रोड या इमारतीच्या प्रस्तावावर चर्चा करताना मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, इमारतीचे वास्तुशास्त्रज्ञ श्री पारकर यांना बदलण्याची गरज आहे व त्यांना नवीन पॅनलवर घेण्यात येऊ नये असे ठरले आहे. वरील माहितीनंतर दुसरा वास्तुशास्त्रज्ञ नेमण्याच्या अटीवर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. द-१७१ वरील इ. क्र. ८१, कॅव्हल क्रॉस लेन नं. २ या इमारतीच्या प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, इमारतीत अनिवासी गाळेधारक जास्त असून ~~फक्त~~ नॉन-स्ट्रक्चरल दुरुस्ती करण्याची गरज आहे व केवळ प्लास्टरिंगसाठीच रु. ४०,०००/- खर्च करण्यात येत आहेत. यावर उ. मु. अभि. श्री वनीकर यांनी

माहिती दिली की, संबंधित कार्य.अभि. यांनी इमारतीच्या भाडेकरूंशी संपर्क साधला असून एन.ओ.सी. घेण्यास ते लोक तयार नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. रु.१९,०००/- पैकी रु.१०,०००/- भरलेले आहेत. वरील माहितीनंतर सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

मा.सभापती यांनी सूचना दिल्या की, सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचना व घेतलेल्या हरकती तसेच ज्या इमारतींची पहाणी करण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केली आहे त्याबाबत त्यांना एक-दोन दिवसांत पत्र पाठवून वेळ निश्चित करण्यात यावी तसेच उ.मु.अभि. श्री भूवनदास यांनी मा.सदस्य श्री खोपकर यांनी मांडलेल्या मुद्दयांबाबत त्यांना लेखी उत्तर द्यावे.

मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत ४६,इ,तुकाराम जावजी मार्ग या इमारतीच्या भाडेकरूंची यादी देण्यात आली नव्हती ती आता अनुपालन अहवालाअंतर्गत देण्यात आलेली आहे. सदर यादीची सर्वानुमते नोंद घेऊन मंजूर करण्यात आली.

मा.सभापती यांनी माहिती दिली की, मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी इ.क्र.१६३,ई,वसंत कुंज,बी.ए.रोड,दादर या इमारतीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत विनंती केली असून सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

मा.सभापती यांनी माहिती दिली की,उपमुख्य अभियंता[उत्तर] व [दक्षिण] यांनी तांतडीने दुरुस्ती करण्याची गरज आहे अशा पाच इमारतींचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. तेखालीलप्रमाणे.

[१] वसंत कुंज, बी.ए.रोड, दादर.

[२] २२०, नरसी नाथा स्ट्रीट ,

[३] ३०५, अब्दुल रहेमान स्ट्रीट,

[४] ६३-६७, सी.पी.टँक रोड,

[५] १२-१२-बी,१४-१४डी व २-२ई, नौशेर भरुचा मार्ग.

सविस्तर चर्चेअंती वरील पाच प्रस्तावांपैकी २२० नरसीनाथा स्ट्रीट या इमारतीचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात येऊन बाकीचे चार प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

ठराव क्रमांक : ४८/३००

दक्षिण परिमंडळातील खालील प्रस्तावांबर सविस्तर चर्चा होऊन सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सूचना/हरकतींच्या आधारे अंतिम निर्णय घेण्यात आला.

[अ] इ. क्र. ३५, बी, मुगभाट क्रॉस लेनच्या दुरूस्ती कामाबाबतचे प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यास मंजूरी देण्यात आली. तसेच दरम्यानच्या काळात ८७[अ] चा प्रस्ताव मागे घेण्यास संमती देण्यात आली.

[ब] इ. क्र. ३८२, ए, बी, सी. मौलाना शौकत अली रोड या इमारतीच्या दुरूस्तीच्या प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास प्रस्तावित केल्यानुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[क] इ. क्र. ३१, पारीख स्ट्रीट या इमारतीच्या दुरूस्तीसाठी प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झालेल्या खर्चास प्रस्तावित केल्या-प्रमाणे सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ड] दक्षिण परिमंडळातील परिशिष्ट "ब" मधील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना व नकाशांना सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सूचना/ हरकतींच्या आधिन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी २१८-२२०, नरसीनाथा स्ट्रीट या इमारतीचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात येऊन खालील चार प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

[१] १६३, ई, वसंतकुंज, बी. ए. रोड, दादर.

[२] ३०५, अब्दुल रहेमान स्ट्रीट,

[३] ६३-७३, सी. पी. टँक रोड/ २-२२, दुसरी पांजरपोळ,

[४] १२-१२-बी, १४-१४-डी, २-२ई [४-४सी व ६-सी], नौशिर भरूचा मार्ग.

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घ्यावयाचे प्रस्ताव.

विषय- मुंबई बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या "अ" वर्गातील उपकरपात्र मालमत्तांना २.०० च. क्षे. नि. साठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचे प्रस्ताव.

उपरोक्त विषयाचे तीन प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांना सादर करण्यात आले.

[१] भूकर पहाणी क्रमांक- १३१०, गिरगांव, विभाग, इ. क्र. १६, खोताची वाडी, उपकर क्र. डी-११२८, डी. विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करणेबाबत.

[२] भूकर पहाणी क्र. ३६/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र. २५, दादर माटुंगा इस्टेट, इ. क्र. २३४, उपकर क्र. एफ-६६६८, [१] दादर, पूर्व, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

[३] भूकर पहाणी क्र. १८१०, माहीम विभाग, भूखंड क्र. १००, शिवाजी पार्क स्कीम, उपकर क्र. जीएन-३६६७[१], एम. बी. राऊत मार्ग, शिवाजी पार्क मुंबई येथील "शांतीलता" म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

वरील प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सभापतींनी सभागृहास अशी माहिती दिली की, अद्याप सुकथनकर समितीचा अहवाल जाहीर न झाल्यामुळे वरील तिन्ही मालमत्तांचे घरमालक व भाडेकरू हे मिळून त्यांच्या मालमत्तेचा २.०० च. क्षे. नि. वापरून पुनर्विकास करू इच्छितात. मालमत्ताधारकांनी २.०० च. क्षे. नि. देण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली असून, विभागीय अधिका-यांनी त्याची छाननी करून मंजूरीसाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे सुचविले की, ना हरकत प्रमाणपत्रांतर्गत पुनर्रचित केलेल्या इमारतीमधील मंडळास मिळालेल्या गाळ्यांची माहिती देण्यात यावी. यावर मा. सभापती यांनी उपमुख्य अधिकारी श्री मोरे यांना मंडळास मिळालेल्या गाळ्यांचा सन्मा. सदस्यांना तपशील देण्याविषयी सूचना दिल्या. मा. सदस्य श्री उसपकर यांनी अशी शंका व्यक्त केली की, सदर इमारतीतील भाडेकरूंनी विकसकास दिलेल्या संमतीची/करारपत्राची पहाणी करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत भाडेकरूंनी विकसकास संमती दिल्याबाबतची संमतीपत्रके करारपत्रे विकसकाने सादर केलीअसल्याचे सांगण्यात आले.

वरील प्रस्तावांवर सविस्तर प्रदीर्घ चर्चेनंतर सर्वानुमते सदर मालमत्तांच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यास संमती देण्याचे ठरले.

....३०/-

ठराव क्रमांक : ४८/३८१.
÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷÷:

मुंबई बैटाबरील "अ" वर्गातील उपकरपात्र जुन्या व मोडकळीस आलेल्या खालील तिन्ही मालमत्तांना " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यास सर्वानुमते सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सूचना/हरकतींस आधीन राहून मान्यता देण्यात आली.

[१] भूकर पहाणी क्र. १३१०, गिरगांव विभाग, इ. क्र. १६, खोताची बाडी, उपक क्र. डी. ११२८, [डी. विभाग], मुंबई.

[२] भूकर पहाणी क्र. ३६/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र. २५, दादर माटुंगा इस्टेट, इ. क्र. २३४, उपकर क्र. एफ-६६६८ [१], दादर[पू] मुंबई.

[३] भूकर पहाणी क्र. १८१०, माहीम विभाग, भूखंड क्र. १००, शिवाजी पार्क स्कीम, उपकर क्र. जीएन-४६६७ [१], एम. बी. राऊत मार्ग, शिवाजी पार्क, मुंबई.

विषय- दि. २९. ६. ९७ रोजी मुं. इ. दु. व. पु. मंडळाची काळबादेवी येथील गणेशभुवन पुनर्रचित इमारत अचानक कोसळून जखमी व मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना विशेष बाब म्हणून आर्थिक सहाय्य वाढवून देण्याबाबत.

उपरोक्त बाब टिपणी प्र उपमुख्य अधिकारी [सं. गा.] यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सादर केली. सदर बाबीवर चर्चा करताना मा. सभापती यांनी माहिती दिली की, गणेशभुवन ही इमारत कोसळून ज्या व्यक्ती मृत पावल्या त्यांच्या वारसांना रु. १०,०००/-, जखमींना रु. ५०००/- देण्याचे ठरले होते. परंतु आता विशेष बाब म्हणून मृत व्यक्तींच्या वारसांना एक लाख रुपये द्यावेत असे सुचविण्यात आले आहे. व त्यांनी असे मत व्यक्त केले की, अशाप्रकारे विशेष बाब करण्यात येऊ नये असे त्यांना व्यक्तीशः वाटते. कारण यामध्ये अनेकप्रकारच्या अडचणी येऊ शकतात. विशेष बाब ही प्रथा पडता कामा नये कारण एकदा जर एक लाख रुपये विशेष बाब म्हणून दिले तर भविष्यात कोसळणाऱ्या

इमारतीतील लोकही एक लाख रुपयाची मागणी करतील व न दिल्यास न्यायालयात दावा दाखल करू शकतील. मा. न्यायालयाने पूर्वी दिलेल्या एका निर्णयाचे उदाहरण देऊन त्यांनी सांगितले की,

" Discretionary power can be utilised in the larger interest of society & not for a particular person."

मा. सदस्य श्री भूबड यांनी निदर्शनास आणले की, मुख्य अधिकारी यांनी बैठकीत चर्चेच्यावेळी सांगितले होते की, जे मृत झालेले आहेत ते मूळ भाडेकरू नव्हते. तर त्या बाहेरील व्यक्ती होत्या. म्हणजे कायदेशीर भाडेकरू नसलेल्या व्यक्तीस एक लाख रुपये देणे ही बाब न पटणारी आहे. उद्या रस्त्यावरील भिकारी एखाद्या इमारतीत गैरउद्देशाने गेला व मृत पावला तर त्यालाही पैसे द्यावे लागतील. तरी ही विशेष बाब मंजूर करू नये असे त्यांनी आपले मत दिले.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, विशेष बाब म्हणून एक लाख रुपये देण्यात येऊ नयेत. जर मंत्री महोदयांना द्यावयाचे असतील तर त्यांनी मुख्य मंत्री सहाय्य निधीतून विशेष बाब मान्य करुन द्यावी व त्यांना एक लाख रुपये द्यावेत.

वरील प्रस्तावावर प्रदीर्घ चर्चा झाल्यावर सविस्तर चर्चेअंती सर्व सन्मा. सदस्यांनी विशेष बाब म्हणून मृत व्यक्तीच्या वारसास एक लाख रुपये देण्यास सर्वानुमते विरोध दर्शविण्यात आला.

उपसचिव श्री कोकणे यांनी असे मत प्रदर्शित केले की, गणेश भुवन ही मंडळाचीच पुनर्रचित इमारत होती. त्यामुळे या इमारतीच्या अपघातातील जी काही जबाबदारी वा उत्तरदायित्व आहे ते मुं. इ. दु. व. पु. मंडळावर आहे हे आपण नाकारू शकत नाही. आजपर्यंत अशा रितेने सानुग्राह अनुदान देण्याची घटना घडलेली नाही आणि एखादी विशेष बाब एखाद्या मंडळाने करावयाची ठरली तर प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली एकूण ९ मंडळे आहेत. प्रत्येक मंडळ जर अशा काही विशेष बाब करावयास लागले तर तो एक चांगला पायंडा पडेल असे त्यांना स्वत:ला वाटत नाही. प्राधिकरण हे सर्व मंडळाचे छत्रधारी अशी बॉडी असल्यामुळे प्राधिकरणाने याबाबत निर्णय घ्यावा असे वाटते.

याबाबत अधिक माहिती देताना मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, अशाप्रकारच्या अपघातग्रस्त प्रकरणी मंडळ ज्या उपकरपात्र इमारतींचा इन्शुरन्स आहे त्या इन्शुरन्समधून अनुदान देते. सदर इमारत ही उपकरपात्र इमारत नाही. जर सानुग्राह अनुदान देण्याचे ठरले तर

इन्शुरन्स कंपनी मंडळाला पैसे देणार नाही शिवाय कोठल्याही बाहेरच्या व्यक्तीस दुर्दैवाने अपघात होऊन मृत पावल्यास अशाप्रकारे पैसे देण्याची गरज नाही. उपकरपात्र इमारतीतील रहिवाशी जर अपघातात मृत पावल्या तर त्याच्या वारसास आपण दहा हजार रुपये देतो व जखमींना पाच हजार रुपये देतो. कारण त्या इमारतींचा इन्शुरन्स मंडळाने काढलेला असतो. व त्या इन्शुरन्सचे मंडळ प्रिमियम देत असते.

मुख्य अधिकारी यांनी असे सुचविले की, मंडळाची कायदेशीर जबाबदारी असल्यामुळे रु. १०,०००/- ही रक्कम फार कमी होत आहे. म्हणून मृत व्यक्तीच्या वारसास रु. ५०,०००/- द्यावेत व जखमी व्यक्तीस रुपये ५,०००/- ते १०,०००/- द्यावेत व त्या रक्कमेपेक्षाही बील जास्त असेल तर तेवढे बील द्यावे किंवा जास्तीतजास्त रुपये- २५,०००/- द्यावेत. याकरता इन्शुरन्सचे प्रिमियम वाढवून ते भरण्यात यावेत म्हणजे उपकरपात्र इमारतीत रहाणाऱ्या रहिवाशांना काही तरी दिलासा मिळेल.

उपसचिव श्री कोकणे यांनी असे मत मांडले की, मुख्य अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे मृत व्यक्तिसाठी रु. १०,०००/- ऐवजी रु. ५०,०००/- करावेत या मताशी ते सहमत आहेत. परंतु जखमी व्यक्तीस रु. ५,०००/-पेक्षा जास्त खर्च आल्यास काय करणार ? अशी विचारणा करुन त्यांनी असे सुचविले की, जखमी व्यक्ती शासकीय रुग्णालयात उपचार घेणार असल्यामुळे खर्चाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जखमी व्यक्तीस सरसकट रु. ५०००/- देण्यात येतात. त्यासाठी आपण इतर काहीही पहात नाही, फक्त व्यक्ती जखमी आहे एवढेच पहातो. म्हणून जखमींना रु. २५,०००/- करु नयेत. कारण एखाद्याला नुसता मुका मार लागला तरी ती व्यक्ती रु. २५,०००/- घेईल.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, जर एखाद्याची जखम किरकोळ असेल तर रु. ५०००/- द्यावयाचे परंतु एखाद्याचे जर हात व पाय मोडले तरीही रु. ५०००/- द्यावयाचे हे न्यायास धरुन नाही. म्हणून जर एखादी व्यक्ती गंभीररित्या म जखमी झाली असेल तर उपचारासाठी प्रत्यक्ष किती खर्च आला ते तपासून पहावे व जास्तीतजास्त रु. २५,०००/- द्यावेत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी माहिती दिली की, एम्. एस. सी. टी. कायद्यामध्ये हल्ली नवीन सुधारणा करण्यात आली आहे की, पूर्वी व्यक्ती मृत पावली तर रु. २५,०००/- देण्यात येत असत परंतु आता रु. ५०,०००/- देण्यात येतात व जखमी व्यक्तीस त्याच्या जखमांची गांभीर्यता पाहून जास्तीतजास्त पूर्वी रु. १५,०००/- देण्यात येतहोते ते आता रु. २५,०००/- करण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर याप्रकरणी कार्यवाही करण्यास हरकत नाही.

मुख्य अधिकारी यांनी मा. सदस्य श्री भुवड यांना विनंती केली की, त्यांनी या विषयाबाबत मार्गदर्शक अशी टिपणी दिल्यास ती पुढील बैठकीत ठेवण्यात येईल व निर्णय घेण्यात येईल. मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा परंतु मृत व्यक्तीस एक लाख रुपये द्यावेत हे त्यांना मंजूर नाही.

मुख्य अधिकारी यांनी असे सुचविले की, मृत व्यक्तीस इन्शुरन्स मधून रु. ५०,०००/- द्यावयाचे या मतास मंजूरी द्यावी व जखमी व्यक्तीस देण्यात यावयाच्या अनुदानाबाबत टिपणी पुढील बैठकीत ठेवण्यात यावी.

वरील प्रदीर्घ चर्चेअंती सर्वानुमते सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यात येऊन सविस्तर टिपणी पुढील बैठकीमध्ये ठेवण्याचे ठरले.

मा. सभापती यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले की, निवासी कार्यकारी अभियंता श्री गद्रे हे या महिन्याच्या शेवटच्या तारखेस निवृत्त होत आहेत. श्री गद्रे यांना अनेक वर्षांचा चांगला अनुभव असून मंडळासही त्यांच्या सेवेचा चांगला फायदा झाला आहे. मध्यंतरीच्या काळात एका इमारतीच्या अपघातामध्ये त्यांचा दोष नव्हता तरीही त्यांना खातेनिहाय चौकशीस सामोरे जावे लागले व त्यांना मानसिक तणाव सहन करावा लागला. होता. अखेरशेवटी त्यांची प्राधिकरणाच्या स्तरावर निर्दोष मुक्तता करण्यात आली त्याबद्दल त्यांचे त्यांनी अभिनंदन केले व सर्वांच्या वतीने श्री गद्रे यांना उर्वरित आयुष्य सुखाचे व चांगले जाओ अशा शुभेच्छा व्यक्त करून शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

आयत्यावेळचे विषय :-
++++++++++++++++

मा. सदस्य श्री मोडक यांनी असे मत व्यक्त केले की, वेगवेगळ्या वर्तमानपत्रामध्ये मंडळाबद्दल ज्या बातम्या छापून आल्या आहेत व चर्चा होत आहे त्याबाबत प्रत्येक सदस्य. सदस्याने व अधिकाऱ्याने विचार केला पाहिजे व मंडळाचे नांव चांगल्याप्रकारे कसे घेण्यात येईल याकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.

मंडळाचे अधिकारी जेव्हा इमारतीस भेट देतात तेव्हा मा. सदस्य जवळपास असूनही त्यांच्या भेटीची त्यांना कल्पना नसते. भेटीपूर्वी जर

भाडेकरू व सन्मा. सदस्यांना कल्पना दिली तर मंडळ आणि भाडेकरू यांच्यात दुवा साधता येईल व कामातील अडचणीही कमी होतील. मुंबईच्या कानाकोप-यामध्ये मंडळाचे काम चालेले आहे. मा. सभापती यांनी या मताशी सहमती दर्शवून मा. सदस्य श्री मोडक यांनी सुचविल्याप्रमाणे अधिका-यांनी विशेष बाबीमध्ये इमारतीस भेट देण्यापूर्वी सन्मा. सदस्यांना कल्पना द्यावी अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री मोडक यांनी असे मत व्यक्त केले की, मागील २-४ बैठकांमध्ये ज्या इमारतींची अंदाजपत्रके मंजूर झाली आहेत त्यापैकी काही इमारतीतील भाडेकरू, मंडळाचे अधिकारी व ठेकेदार यांच्यामध्ये काही कारणांवरून मतभेद झालेले आहेत. ते दूर व्हावेत व मतभेद होऊ नयेत अशी सूचना आहे. त्यांनी माहिती दिली की, त्यांच्या विभागातील [illegible]- इमारतींना नाहरकत प्रमाणपत्र मंजूर होऊनही काम झालेले नाही. त्यामध्ये तांत्रिक अडचणी आल्या आहेत व असे यापुढे होऊ नये अशी त्यांनी सूचना केली.

यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या की, मा. सदस्य श्री मोडक यांच्याकडून त्यांच्या विभागातील ज्या इमारतींची कामे मंजूर होऊनही झालेली नाहीत त्यांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी करावी व त्यातून मार्ग काढावा.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी असे निदर्शनास आणले की, उत्तर मुंबईमधील मोडकळीस आलेल्या इमारती अधिक असून त्याबाबत मागील बैठकीत मा. सदस्य श्री मोडक यांनी निदर्शनास आणले होते. दक्षिण मुंबईसाठी २० कोटी रुपयाची तरतूद करण्यात येते. म्हणजे ६ विभागांसाठी प्रत्येक जवळजवळ ३½ कोटी रुपयांची तरतूद करीत असतो. उत्तर मुंबईसाठी केवळ ९ कोटी रुपयांची तरतुद केली जाते. म्हणजे ४ विभागांसाठी प्रत्येकी सव्वादोन कोटी रुपये मिळतात. निधिच्या कमतरतेमुळे एवढी कमी तरतूद करण्यात येत असेल. परंतु उत्तर मुंबईतील इमारतींनासुध्दा दुरुस्ती करण्याची आवश्यकता जास्त आहे म्हणून जास्तीत जास्त निधी उत्तर मुंबईसाठी उपलब्ध करून देण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली. पुढे त्यांनी असे मत व्यक्त केले की, पूर्वी सिपोरेक्स कन्स्ट्रक्शनने इमारती बांधण्यात आल्या होत्या. अशा इमारतींमध्ये १६० ते १७० चौ. फू. क्षेत्रफळाचे गाळे होते. अशा पुनर्रचित इमारती आता दुरुस्तीसाठी घेण्यात आल्या आहेत. सदर इमारतीच्या दुरुस्तीच्या कामामध्ये सिपोरेक्स नांवाची एक विशिष्ट प्रकारची पावडर लागते. सदर पावडर उपलब्ध करण्यासंबंधी [illegible]अधिका-यांनी सांगितले होते. परंतु पाठपुरावा करूनही त्या

अधिका-यांना पाहीजे त्या प्रमाणात पावडर मिळत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या माहितीप्रमाणे सध्या एक ते दीड टन पावडर आलेली आहे व आता मंडळाच्या पुनर्रचित इमारती वेळीच दुरुस्त केल्या नाहीत तर इमारतीतील भाडेकरू आणखी किती काळ नादुरुस्त अवस्थेत रहाणार याचा विचार करुन सिफोरेक्स पावडर लवकरात लवकर मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

यावर मुख्य अधिकारी यांनी दुरुस्तीसाठी आवश्यक ते सामान उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधित अधिका-यांना सूचना देण्यात येतील असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी विनंती केली की, इब्राहिम कासम चाळ, गॅस कंपनी लेन या इमारतीचा प्रस्ताव मंडळासमोर आलेला होता. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब न होता जास्तीत जास्त लौकर प्रस्ताव ठेवण्यात यावा. यावर मा. सभापती यांनी आश्वासन दिले की, इब्राहीम कासम चाळीच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी निदर्शनास आणले की, त्यांनी ज्ञानेश्वर नगर, या संक्रमण शिबीरातील गाळ्याबाबत एक तक्रार उपमुख्य अधिकारी [सं. गा.] श्री पाटील यांच्याकडे केली होती. त्या तक्रारीवर श्री पाटील साहेब यांनी त्वरित कार्यवाही केल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. यास सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी असे निदर्शनास आणले की, सामना दैनिकात बातमी छापून आली होती की, एक मराठी कुटुंब बेघर झाले व त्यामध्ये मंडळाचे सभापती श्री मधू चव्हाण यांच्याही नांवाचा उल्लेख होता. म्हणून मा. सभापती यांनी त्याबाबत खुलासा केल्यास बरे होईल अशी विनंती केली.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, माटुंग्यामधील मनुमहल ह्या इमारतीबाबत वर्तमानपत्रात छापून येत होते. ह्या उपकरपात्र इमारतीच्या मालकाने संपूर्ण बेकायदेशीर अनधिकृत बांधकाम केलेले आहे. त्याकडे म. न. पा. चे अधिकारी लक्ष देत नाहीत व मंडळाच्या अधिका-यांकडूनही कोणती कारवाई झालेली नाही तसेच त्या इमारतीत रहाणा-या एका गाळाधारकाने इमारतीचे कॉलम्स वगैरे तोडलेले त्यांनी स्वतः पाहिले आहेत. संपूर्ण इमारतीला तडे गेलेले असून [illegible] नवरे अपार्टमेंट सारखी या इमारतीची अवस्था होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

यावर संबंधित का. अ. श्री लाड यांनी माहिती देताना सांगितले की, सदर मनुमहल ही आर. सी. सी. इमारत असून तळ अधिक दोन मजल्यांची इमारत आहे. इमारतीचे सेक्रेटरी श्री नाडकर्णी यांच्याबरोबर ते स्वत: फिरले असता श्री राव नांवाच्या एका गाळाधारकाने अनधिकृत बांधकाम करून कॉलम्स तोडलेले आहेत. त्याबाबत श्री राव यांच्याकडे विचारणा केली असता म. न. पा. च्या भायखळा येथील कार्यालयाकडून त्यांना परवानगी मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. त्याबाबतचे कागदपत्र त्यांनी मागितले आहेत परंतु ते अजूनही प्राप्त झालेले नाहीत. इमारतीच्या मालकाने तिस-या माळयावर बेकायदेशीर पाण्याची टाकी बांधलेली असल्यामुळे इमारतीला तडे गेलेले आहेत. इमारतीची छायाचित्रेही काढण्यात आली आहेत.

मा. सभापती यांनी यावर माहिती दिली की, बेकायदेशीर कामांची दखल घेण्याचे काम मंडळाचे नसून महानगरपालिकेचे आहे. तरीही उद्या जर त्या इमारतीस नवरे अपार्टमेंट किंवा पूनम चेंबर सारखा अपघात होउन काही दुर्घटना झाली तर त्याची जबाबदारी मंडळावर येईल. म्हणून पुढील बैठकीत सविस्तर अहवाल ठेवण्यात यावा अशी त्यांनी संबंधित का. अ. श्री लाड यांना सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणाले की, संक्रमण शिबीरात २०-२२ वर्षे रहाणा-या काही लोकांच्या इमारती आरक्षणाखाली आहेत तर काही लोकांच्या इमारती पुनर्रचित होणार आहेत. मागच्या बैठकीत असे ठरले होते की, ज्यांना बृहत्सूचीवर घेण्यात आलेले नाही व ज्यांच्या इमारती पुनर्रचित होण्यास आणखी ८-१० वर्षे लागणार आहेत अशा ब-याच वर्षांपासून संक्रमण शिबीरात बैठया चाळीत रहाणा-या लोकांना संक्रमण शिबीरातीलच बहुमजली इमारतीत जागा देण्यात याव्यात. शिवसेनाप्रमुखांनी योजलेल्या झोपडपट्टी सुधारणा योजनेसाठी संक्रमण शिबीरे द्यावयाची आहेत त्या योजनेतील लोकांना संक्रमण शिबीरातील बैठया चाळी नको असून बहुमजली इमारतीत गाळे हवे आहेत. म्हणून त्यांनी सूचना केली आहे की, आणखी ८-१० वर्षे ज्यांना पुनर्रचित इमारतीत जागा मिळणार नाहीत अशा संक्रमण शिबीरातील चाळीत रहाणा-या लोकांना बहुमजली इमारतीत गाळे प्रथम द्यावेत व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील लोकांना चाळीतील बैठे गाळे द्यावेत. म्हणजे बरीच वर्षे संक्रमण शिबीरातील चाळीत रहाणा-या लोकांना न्याय दिल्यासारखे होईल.

मा. सभापती यांनी अशी माहिती दिली की, मुख्य अधिकारी श्री अप्पलवार यांनी असा निर्णय घेतला आहे की, वडाळा येथील बहुमजली इमारती ह्या एस. आर. ए. योजनेसाठी द्यावयाचे नाहीत. खरे तर

एस.आर.ए. योजनेसाठी त्यांनी स्वत:चे संक्रमण शिबीर उभारावयास पाहिजे होते. शासनाने आता संक्रमण शिबीरे बांधण्याचा निर्णय घेतला असून ज्या गाळयांना डागडुजी करण्याची गरज आहे असे गाळे एस.आर.ए. योजनेसाठी द्यावयाचे. तसेच यापुढे एस.आर.ए. च्या मुख्य अधिका-यांकडून शिफारस होऊन आलेल्या गाळेधारकांनाच फक्त मंडळाचे संक्रमण गाळे देण्यात येतील.

मा. सभापती यांनी ~~स्पष्ट करुन सांगितले~~ असे प्रतिपादन केले की, ज्या इमारती कागदावर होणार आहेत परंतु नजिकच्या १० वर्षात होणार नाहीत अशा इमारतीतील लोक २०-२५ वर्षे संक्रमण शिबीरात रहात आहेत. अशा लोकांना दिलासा म्हणून पुनर्रचित इमारतीत जागा मिळेपर्यंत संक्रमण शिबीरातील बहुमजली इमारतीत गाळे द्यावयास हरकत नाही ही सूचना पूर्वीच्या मुख्य अधिका-यांनी तत्वत: मान्य केली होती व तसे आदेशही उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांना दिले होते. परंतु काही कारणांमुळे ते राहीले. असे गाळेधारक फक्त ३०-४० आहेत व त्यांना त्यांच्या विनंती प्रमाणे बहुमजली इमारतीत गाळे देण्यास मान्यता देण्यात आली आहे. यावर मा. सदस्य श्री निवास राव यांनी असे मत व्यक्त केले की, हा प्रश्न त्यांच्या विभागापुरता मर्यादित नसून ती एक धोरणात्मक बाब आहे. यास सर्वांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे मत व्यक्त केले की, मा. सदस्य श्री मोडक व श्री तिकोने यांनी उत्तर परिमंडळासाठी फंड कमी आहे असा मुद्दा मांडला. त्या मुद्दयाशी तेही सहमत आहेत. त्यांनी माहिती दिली की, उत्तर परिमंडळातील अंदाजपत्रके तयार आहेत परंतु निधी कमी असल्यामुळे ती बैठकीत ठेवली जात नाहीत. अशा इमारतींपैकी एखादी इमारत पडली तर त्याची जबाबदारी मंडळावर येऊ शकते. त्यांच्या माहितीतील दादर विभागातील एक दोन इमारती अशा आहेत की, इमारतीला तडे गेलेले स्पष्ट दिसतात आणि त्यामुळे आपण कधीही अडचणीत येउ शकतो. म्हणून निधी जरी कमी असला तरी त्याबाबत गंभीरपणे विचार करावयास हवा.

यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, जी इमारत अतिशय धोकादायक झालेली आहे ती इमारत निधी नाही म्हणून दुरुस्त करण्याची ठेवण्यात येणार नाही. तिची दुरुस्ती करण्यात येईल. जर मंडळाकडे पैसे नसतील तर प्राधिकरणाकडून कर्जाने पैसे घेऊन दुरुस्ती करण्यात यावी अशा सूचना यापूर्वीच दिलेल्या आहेत. म्हणून मंडळाच्या कुठल्या

अधिका-याने सन्मा. सदस्यांना अपु-या निधीमुळे इमारत घेतली नाही असे सांगितले असेल तर ते त्यांना आता सांगावे. कारण वरीलप्रमाणे सूचना देऊनही त्या पाळल्या जात नसतील तर कळून येईल. त्यांनी पुढे असे स्पष्ट केले की, अशा जर काही इमारती असतील तर निदर्शनास आणाव्यात, पैसे नाहीत म्हणून अडवून ठेऊ नयेत, अशा सूचना सर्व अधिका-यांना दिल्या. व मा. सदस्यांना अशा इमारतींची माहिती देण्यास सांगितले व त्या इमारतींबाबत अभियंत्यांनी अभिप्राय दिला तर त्या दुरुस्त करण्यासाठी विचार करण्यात येईल असे आश्वासन दिले.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सन्मा. सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे तत्वत: व्यवहार करता येणार नाही. कारण दक्षिण मुंबईमध्ये तुलनेने नादुरुस्त इमारतींची संख्या जास्त आहे. उत्तर परिमंडळामध्ये "बी" व "सी" कॅटगरीमधील इमारतीत जास्त आहेत म्हणून आढावा बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, उत्तर विभागासाठी जरी पुरेशी आर्थिक तरतुद नसली तरी जर इमारत धोकादायक आहे असे अभियंत्याच्या लक्षात आले तर तरतुद नसली तरी सदर इमारतीची दुरुस्ती करण्यात येईल. मुख्य अधिकारी यांनी आदेश दिले आहेत की, अशा इमारतींचे प्रस्ताव त्यांनी सादर करावेत त्यासाठी जर पैसे नसतील तर प्राधिकरणाकडून घेऊन काम करण्यात येईल.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे निदर्शनास आणले की, इरादापत्र घेतलेले लोक आहेत व त्यांची एक वर्षाची मुदत संपलेली आहे. अशा भाडेकरुंना सावधगिरी म्हणून "वॉर्निंग नोटीस" मंडळाने द्यावी. त्यांनी पुढे असा मुद्दा मांडला की, पुनर्रचित इमारतीतील अनेक अनिवासी गाळे रिक्त असून पडून आहेत. त्यामुळे मंडळाचा महसूल बुडत असल्यामुळे काहीतरी त्यावर ठोस विचार करण्यात यावा.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी कुलाबा संक्रमण शिबीरातील अनिवासी गाळे बरेच वर्षांपासून बंद असून त्याबाबत वारंवार लक्षात आणून देऊनही अद्याप काही निर्णय होत नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, आढावा बैठकीमध्ये कुलाबा व सायन संक्रमण शिबीरातील अनिवासी गाळ्यांसाठी निविदा मागवावयाच्या किंवा गाळ्यांचा लिलाव करुन ते भाड्याने द्यावयाचे याबाबत महिन्याभरात निर्णय घेण्यात येईल व त्याबाबतची माहिती बैठकीत ठेवण्यात येईल.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, १५० असंद भूखंडांबाबत वर्तमानपत्रात छापून आले होते व त्या संदर्भात माहिती देण्यात यावी अशी मागणी केली. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, असा निर्णय झाला आहे की, वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करुन असंद भूखंडांच्या फिझीबिलिटीबाबतचा अहवाल तयार करण्यात येईल व असंद भूखंडांवर किती गाळे होऊ शकतील हे तपासून त्या भूखंडांवर जर २०-२५ गाळे होणार असतील तरी तो भूखंड फुकट घालवायचा नाही. त्यावर तेवढ्या गाळ्यांची इमारत बांधावयाची. त्याप्रमाणे ३० - ३२ भूखंडांसाठी वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्याचा निर्णय झालेला आहे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी निदर्शनास आणले की, ९८, तात्या घारपुरे पथ या इमारतीचे प्रकरण न्यायालयात असून अध्यक्ष/प्रा. यांच्याकडे झालेल्या बैठकीत आश्वासन देण्यात आले होते की, सर्वोच्च न्यायालयात कलम ८-अे ला आव्हान देण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल देण्यात येईल. परंतु अद्याप त्याप्रमाणे काहीही माहिती देण्यात आलेली नाही.

उपसचिव श्री कोकेणे यांनी माहिती दिली की, कलम ८-अे चे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे त्याबाबत कोणतीही प्रगती झालेली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या बेंचने असा निर्णय दिलेला आहे की, घटनेमध्ये जे मूलभूत अधिकार आहेत त्या संदर्भात मुद्दा उपस्थित झालेला असल्यामुळे ही याचिका मुख्य न्यायाधीश यांच्यासमोर ठेवण्यात यावी आणि महाराष्ट्र शासनाच्या बेंचची शिफारस अशी आहे की, किमान पाच न्यायमूर्तींच्या बेंचपुढे प्रकरण ठेवावे. परंतु अजूनही पाच न्यायमूर्तींच्या बेंचची स्थापना झालेली नाही.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी विचारले की, कलम ८-अे ला आव्हान देण्यात आले की, ८-अे ला आव्हान देण्यात आले आहे? यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, ९८, तात्या घारपुरे पथ या इमारतीच्या मालकाने न्यायालयाची दिशाभूल केलेली असून न्यायालयाने त्या दिशाभुलीमुळे निर्णय दिलेला आहे. त्यामुळे डिव्हीजन बेंचपुढे अपिल करण्याचा निर्णय झाला होता. मालकाने अशी दिशाभूल केली की, प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेले प्रकरण हे १०३-ब साठी आहे, ८८[३]अ साठी नाही. सदर प्रकरण सुनावणीसाठीआलेले नसून त्यासाठी दोनदा अर्जही करण्यात आला आहे व पाठपुरावा करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, अ. विभाग कार्यालयाचे दूरध्वनीचे बील न भरल्यामुळे दूरध्वनी बंद आहे. त्यामुळे संपर्क साधणे अतिशय कठिण झालेले आहे व लोकांच्याही त्याबाबत तक्रारी आहेत. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, डी. विभागाची एप्रिल, मे महिन्यांची पाण्याची बिले लेखा विभागाने तशीच ठेवलेली आहेत. त्यामुळे गणपतीच्या वेळी पाण्याचा पुरवठा तोडण्यासाठी महानगरपालिकेचे डी. विभागाचे कर्मचारी आले होते. तेव्हा त्यांना त्यांनी एक महिना थांबावयास सांगितले.

यावर मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, याबाबत तपासणी करुन कार्यवाही त्वरित करण्यात यावी व जीवनावश्यक सेवेची जी बिले अदा करावयाची असतात ती त्वरित केली गेलीच पाहिजेत. बिले न भरल्यामुळे मंडळाच्या बैठकीत त्याबाबत चर्चा होणे हे शोभादायक नाही असेही मत मा. सभापती यांनी व्यक्त करुन लेखा विभागाला त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, कुलाबा संक्रमण शिबीरात अनिवासी गाळे अजूनही वितरीत न झाल्यामुळे संक्रमण शिबीरात फेरीवाले खूप वाढलेले आहेत. मागील बैठकीत मुख्य अधिकारी व सभापती यांनी सदर शिबीरास भेट देण्याचे ठरले होते परंतु अद्याप तशी भेट देण्यात आलेली नाही व या आठवड्यात भेट देण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली. त्यांनी पुढे माहिती दिली की, फेरीवाल्यांबाबत महानगरपालिकेकडे तक्रार केली असता महानगरपालिकेने त्यांना सांगितले की, ती जागा म्हाडाची असल्यामुळे ते काहीही करु शकत नाहीत. पोलीसांनीही म्हाडाकडे जाऊन तक्रारी कराबी असे सांगितले. म्हाडाचा "अ" विभाग फक्त दुरुस्ती व पुनर्रचनेची कामे पहातो. त्यामुळे सदर प्रश्न हा देखभाल विभागाच्या कक्षेत येतो. सदर संक्रमण शिबीराची अवस्था इतकी खराब आहे की, हे संक्रमण शिबीर आहे की झोपडीवासियांची वसाहत आहे असा प्रश्न पडतो. भाडेकरुंना चालण्यासाठी पुरेशी जागा नाही, गाडी जाऊ शकत नाही अशी अवस्था आहे. तेथे पहारेकरी नसल्यामुळे शिबीराचा गेट व भिंत तोडलेली आहे. चार झोपडपट्ट्यांच्या मधोमध हे शिबीर असल्यामुळे बाहेरुन हे शिबीर दिसतच नाही व हे शिबीर म्हणजे झोपडपट्टीचाच एक भाग वाटतो.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, सिताराम बिल्डिंग, एम. जी. रोड या इमारतीच्या उघडया गच्चीवर बांधकाम करुन

आणखी एक गच्ची करण्यात आली आहे. आणि आता मंडळातर्फे ती इमारत दुरुस्त करण्यात यावयाची आहे. हे बांधकाम जवळजवळ ५००० चौ. फू. क्षेत्रफळाचे असून ते त्या इमारतीच्या मालकाने केलेले आहे. संबंधित वास्तुशास्त्रज्ञास सदर वाढीव बांधकामाचे क्षेत्रफळ कोणत्याही परिस्थितीत धरण्यात येऊ नये असे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. मालकावर कारवाई सुरु झालेली आहे. महानगरपालिकेचे कर्मचारी कारवाई करण्यासाठी आले असता जनता दल कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर दगडफेक केली. ही सदर कारवाई कोणत्याही दबावाखाली थांबविण्यात येऊ नये अशी त्यांनी मागणी केली.

मा. सदस्य श्री खोपकर यांनी माहिती दिली की, गुलमोहर या पुनर्रचित इमारतीतील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्या म्हणविणाऱ्या श्रीमती चित्रे यांच्या ताब्यात ६ गाळे आहेत. ते गाळे मंडळाच्या ताब्यात येत नाहीत. खरे तर मंडळास अनधिकृत लोकांना गाळ्याबाहेर काढण्याचे अधिकार आहेत. सदर बाबत ६ महिन्यांपूर्वीच कारवाई करण्याबाबत त्यांनी मागणी केली होती. सदर गाळे हे इमारतीच्या लिफ्टच्या जागेवर असून सहा मजल्यांच्या लिफ्टची जागा ती बाई वापरते. यावर मा. सभापती यांनी उपमुख्य अधिकारी श्री मोरे यांनी ताबडतोब लक्ष घालून सदर गाळ्यांची तपासणी भाडेवसुलीकारांकडून करुन घ्यावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री साटम यांनी असे निदर्शनास आणले की, आर्थर रोड परिसरातील पानसरे चाळीची जागा बऱ्याच दिवसांपासून पुनर्बांधणी योजनेसाठी पडून आहे. याबाबत पुढील बैठकीत कायदेशीर अडचणींमधून काहीतरी मार्ग काढून अहवाल ठेवण्यात यावा अशी त्यांनी मागणी केली.

मा. सदस्य श्री खोपकर यांनी असे मत व्यक्त केले की, नि. का. अ. श्री गद्रे हे निवृत्त होत आहेत. सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने त्यांनी विनंती केली की, श्री गद्रे यांनी म्हाडातील अनुभव व पुढे ते काय करणार आहेत त्याबाबत बोलावे.

मा. सदस्य श्री भुवड यांनी अशी सूचना केली की, ज्या ज्यावेळी मंडळाचे अधिकारी निवृत्त होणार असतील त्या त्यावेळी मा. सदस्यांना कळविण्यात यावे म्हणजे सन्मा. सदस्यांच्यावतीने ते त्या अधिकाऱ्याचा मानसन्मान करु शकतील.

मा. सभापती यांनी सामना या दैनिकात आलेल्या बातमीबाबतचा खुलासा सभागृहात वाचून दाखविला. याबाबत त्यांनी अधिक स्पष्ट करताना सांगितले की, अखिल अधिकाऱ्याने अर्जदाराचा अर्ज फेटाळून लावलेला असताना पुन्हा त्यांनीच असे आदेश दिले की, उपमुख्य अधिकारी यांनी अर्जदारास सुनावणी देऊन हस्तांतरणाने भाडेपट्टा बदलणे शक्य आहे काय यावर त्यांनी

निर्णय द्यावा. अखिल अधिकाऱ्यांचे हे आदेश पूर्णत: चुकीचे असून असे मत व्यक्त करुन मा. सभापती यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, "सामना" दैनिकात वरील बातमी आल्यानंतर सामना वर्तमानपत्राच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी मा. अध्यक्ष/प्र. यांची बोलणी झाल्यानंतर त्यांनीही नाराजी व्यक्त केली की, अशा अतिरंजित बातम्या दिल्या जाऊ नयेत व आता योग्य असे स्पष्टीकरणही सामना दैनिकात छापून आले आहे.

मा. सभापती यांनी वरील माहिती दिल्यानंतर मधल्या काळात ज्या दोन घटना घडल्या त्याची माहिती उपमुख्य अभियंता [द.] यांना सभागृहास देण्यास सांगितले. उपमुख्य अभियंता श्री वनीकर यांनी अ मा. सभापतींच्या आदेशानुसार माहिती देताना सांगितले की, इ.क्र. ६९-७१, ट्रीनिटी स्ट्रीट, मेट्रो चेंबर, मेट्रो सिनेमासमोर ह्या इमारतीविषयी मुख्य अभियंता/प्र. यांच्याकडे एक तक्रार आली होती. त्याबाबत चौकशी करण्याचे त्यांना आदेश देण्यात आले होते. इमारतीच्या पहाणीमध्ये असे दिसून आले की, इमारतीच्या बाह्य भागाचे गेल्यावेळचे काम सुरु होते परंतु बाकी कोठलेही काम झालेले नव्हते. लेखा विभागककडून त्या कामाच्या बिलाविषयी चौकशी केली असता त्यांच्याकडून कळले की, रुपये पाच लाख सात हजार चे बिल दि. २५ जून ९७ रोजी पारित करण्यात आले. परंतु त्या कामाची मोजमाप पुस्तिका व इतर नोंदी असलेल्या वह्या चोरीस गेलेल्या आहेत. ही बाब गंभीर असल्यामुळे त्यांनी ह्याबाबत प्रशासनाकडे गोपनीय अहवाल पाठविला. त्याची दक्षता शाखेकडून चौकशी सुरु आहे. प्रशासनाने श्री साधवाणी व श्री मीरकर या अभियंत्यांची बदली केलेली आहे. बाकीचे निष्कर्ष चौकशीनंतर मिळतील. मध्यंतरीच्या काळात संबंधित कार्य. अभि. यांनी कळविले की, न झालेल्या कामाचे पाच लाख सात हजार रुपयांचे बील संबंधित ठेकेदाराने व्याजासह धनादेशाव्दारे दिलेले आहे. संबंधित का. अ. यांना सूचना देण्यात आल्या आहेत की, संबंधित ठेकेदार एम. आय. कुरेशी याची जी कामे संपण्याच्या अवस्थेत आहेत वा प्रगतीपथावर आहेत त्याची माहिती द्यावी. कारण बऱ्याच पैशांची वसुली त्याच्याकडून करावयाची आहे. तसेच सी-३/सी-४ विभागाकडून लेखा शाखेस माहिती देऊन त्यांच्या करारनाम्याची आणि देयकांविषयीची संपूर्ण सखोल चौकशी करुन अहवाल ताबडतोब देण्याच्या सूचना दिल्यानंतर आणखी एक प्रकरण ७७-बी, चंदनवाडी या इमारतीचे प्रकरण उजेडात आले. या प्रकरणात एका कामाचे दोनदा पेमेंट झालेले आहे. व त्याच्या दोन्ही वेळच्या मोजमाप पुस्तिका गहाळ झालेल्या आहेत, अशी तक्रार त्यांच्याकडे आल्यानंतर कार्यकारी अभियंत्यासह मी इमारतीची पहाणी दुसऱ्या दिवशी केली. त्यावेळी असे लक्षात आले की, काम झालेले नव्हते.

तरीही त्या कामाचे दि. ५. ७. ९६ रोजी ३,४५,०००/- रुपयांचे पहिले देयक व दुसरे त्याच कामाचे पहिले देयक म्हणून रु. ३,४४,६००/- दिनांक- २१. ८. ९७ रोजीम्हणजे एक वर्षाच्या कालावधीनंतर झाले. ही बाब गंभीर असल्यामुळे आणि काम न होताही देयके पारित केल्यामुळे तसेच कागदपत्रा गहाळ झालेली असल्यामुळे सदर बाब पुन्हा गोपनीय अहवालाव्दारे प्रशासनाकडे पाठविली आहे व त्या स्तरावर कारवाई चालू आहे.

मा. सभापती यांनी असे स्पष्ट केले की, सदर बाब गोपनीय असल्यामुळे मुख्य अधिकारी, ते स्वत: व प्राधिकरण यांनी गंभीर नोंद घेतलेली आहे. ~~[illegible]~~

मा. सभापती यांनी संक्रमण गाळे बदलून देण्याबाबतच्या प्रकरणा-मध्ये माहिती देताना सांगितले की, श्री मांजरेकर म्हणून एक गृहस्थ त्यांच्याकडे गाळा बदलून देण्यासाठी आले होते. परंतु सदर प्रकरण घुसखोरीचे होते व त्यामध्ये मंडळाचे मिळकत व्यवस्थापक श्री माने यांचा सहभाग होता. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

श्री गद्रे, सचिव/नि. का. अ, दु. व. पु. यांनी मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे त्यांना देण्यात आलेल्या निरोपाबद्दल मन:पूर्वक आभार मानून त्यांनी त्यांच्या गेल्या ३४ वर्षातील कारकीर्दीबाबत संक्षिप्त माहिती सभागृहास दिली व आपले छोटेसे भाषण संपविले.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांनी मांडलेले मुद्दे व केलेल्या सूचना विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी व तसे त्यांना कळविण्यात यावे अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देऊन सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे आभार मानून आजची बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

सचिव / दु. दु. व पु. मंडळ

मु. अ / दु. दु. व पु. मंडळ

20/11/98

सभापती / दु. दु. व पु. मंडळ

032
20-11-98

2589 टिप्पणी
20-11-98

दिनांक १५.१०.९७ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ४८ व्या बैठकीत सादर करण्यात आलेली अंदाजपत्रके.

[उत्तर परिमंडळ]
परिशिष्ट "[illegible]"

अ.क्र.	विभाग वर्गवारी.	इमारतीचा तपशील.	दुरुस्तीचा टप्पा / मंडळ/ना.ह.प्र.	मजल्यांची रहिवाश्यांची संख्या. नि.+ अनि = एकूण.	बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी. / दुरुस्तीचा दर प्रति चौ.मी.	अंदाजपत्रकाची एकुण रक्कम.	निव्वळ टप्प्याची रक्कम.	रु.७५० प्रति चौ.मी. दराने मर्यादित रक्कम.	रु.७५० प्रति चौ.मी. पेक्षा जादा असलेली रक्कम.	शेरा.
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१]	ई-१ / "अ"	१६ नबाब टँक रोड, नागपाडा.	पहिला / मंडळ.	तळ + १ / १३+०=१३	२७६.५७ / ४३८.८९	१,२१,३८४/-	१,२१,३८४/-	१,२१,३८४/-	---	मंजूर.
२]	ई-१ / "अ".	६२-६६ म्हातारपाखाडी रोड.	तिसरा / मंडळ.	तळ + १ / ६+२=८	३८६.१४ / ७१३.१०	२,७५,३५७/-	२,२३,३१६/-	२,२३,३१६/-	---	मंजूर.
३]	ई-१ / "अ".	२१-बी म्हातारपाखाडी रोड.	दुसरा / ना.ह.प्र.	तळ + १ / ६+०=६	५५७.४८ / १३१९.०१	७,३५,३३६/-	४,६७,६८५/-	१,५०,४६७/-	३,१७,२१८/-	मंजूर.
४]	ई-१ / "अ".	३ पहिली कारपेंटर स्ट्रिट.	पहिला / मंडळ.	तळ + २ / ४ + १=५	४२७.४४ / ६९७.८२	२,९८,२७७/-	२,९८,२७७/-	२,९८,२७७/-	---	मंजूर.
५]	ई-१ / "अ"	६९-७३ रामभाऊ भोगले मार्ग, संघवी भुवन.	चौथा / मंडळ.	तळ + २ / ४४+८=५२.	१९२४.२६ / ७३४.३२	१४,१३,०४०/-	३,१७,२१५/-	३,१७,२१५/-	---	मंजूर.
६]	ई-१ / "अ".	२७-२९ कॉपरस्मिथ रोड. हाजीकासम बिल्डिंग.	दुसरा / मंडळ.	तळ + १ / २१+०=२१	५६१.२३ / ७१८.६५	४,३०,३३०/-	१,५१,८३३/-	१,५१,८३३/-	---	मंजूर.
७]	ई-१ / "अ".	३३ सी, म्हातारपाखाडी रोड.	दुसरा. / मंडळ.	तळ + १ / ४+०=४	४७१.२४ / ७३६.३१	३,४६,९८२/-	१,७६,००१/-	१,७६,००१/-	---	मंजूर.

.....२/-

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
८]	ई-१ / "अ".	१७७-१८७ हुमायुं बिल्डिंग डॉ. बी. ए. रोड.	चौथा [सुधारित] / मुंडळ.	[अंशत:] तळ + १ + २ / १८ + ४ = २२	१३८७.०० / ७३५.९६	१०, २०, ७८८/-	३, ६७, ६३९/-	३, ६७, ६३९/-	—	मंजूर.
९]	ई-१ / "अ".	४३ संजना मेंन्शन, डॉ. बी. ए. रोड.	तिसरा / मंडळ.	[अंशत:] तळ + ४ + ५ / ८ + ६ = १४.	१२९१.९१ / ४९९.७२	६, ४४, ३१२/-	१, ५४, ४३२/-	१, ५४, ४३२/-	——	मंजूर.
१०]	ई-१ / "अ".	४-४ बी चमार लेन, भायखळा [पूर्व].	चौथा / मुंडळ.	तळ + २ / १८ + १ = १९.	५०५.५६ / ७०९.२१	३, ७८, ७७२/-	१, २४, ६२६/-	१, २४, ६२६/-	——	मंजूर.

...३/-

दि. १५.१०.९७ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ४८ व्या बैठकीत मंजूर करण्यांत आलेली अंदाजपत्रके [उत्तर परिमंडळ]

अ.क्र.	विभाग	वर्गवारी.	इमारतीचे नांव.	दुरुस्ती टप्पा मंडळ/ना.ह.प्र.	मजल्यांची रहिवाश्यांची संख्या नि+अनि= एकूण.	क्षेत्रफळ चौ.मी. दर चौ.मी. खर्च.	अंदाजपत्रकाची एकुण रक्कम. निव्वळ टप्प्या-ची रक्कम.	रु.७५०/-चौ.मी. दराप्रमाणे मंजूरी करीता प्रस्तावित रक्कम.	रु.७५०/-चौ.मी.पेक्षा जादा असलेली रक्कम.	शेरा
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१]	ई-२.	"अ".	२-४ धेलाबाई, २री गल्ली.	ति. टप्पा. मंडळ.	तळ+ २ / ४०+४=४४	११२७.०० / ६३५.२५	७१०३५९/- / ५२५०२११/-	५२५०२११/-	--	मंजूर.
२]	ई-२.	"अ".	४८१-बी, एन.एम.जोशी मार्ग.	दु. टप्पा. मंडळ.	तळ + १ / ६८+०=६८	१०३३.१० / ७३२.६८	७५८२४६/- / ५९४००५/-	५९४००५/-	--	मंजूर.
३]	ई-२.	"अ".	२१-बी, दुसरी सांखळी स्ट्रिट.	दु. टप्पा. मंडळ.	तळ + ३ / १२+५=१७	५०३.०० / ७०३.६९	३५३९५७/- / ३१०६६२/-	३१०६६२/-	--	मंजूर.
४]	ई-२.	"अ".	१४५-सी, पानसरे चाळ [साने गुरूजी मार्ग].	चौ. टप्पा. मंडळ.	तळ + २ / ६०+०=६०	११२४.०० / ७२१.७३	८११२३१/- / २६०५६३/-	२६०५६३/-	--	मंजूर.
५]	ई-२.	"अ".	५४-बी, एम.ओ. रोड.	दु. टप्पा. मंडळ.	तळ + १ / ...+८=४०	६६५.०० / ६०५.६७	४०२७७३/- / ३२४३१९/-	३२४३१९/-	--	मंजूर.
६]	ई-२.	"अ".	३६ कामाठीपुरा, ७वी गल्ली.	प. टप्पा. मंडळ.	तळ + १ / ८+१=९	१२२.०७ / ५९४.९२	७२६२२/- / ७२६२२/-	७२६२२/-	--	मंजूर.
७]	ई-२.	"अ".	८४ अ, एम.ए. रोड.	चौ. टप्पा. मंडळ.	तळ+३ / ३४+४=३८	११३३.७८ / ८१५.५४	९२४६५३/- / २५०६९३/-	१७६३७५/-	७४३१८/-	मंजूर.

...४/-

७

दि. १५.१०.९७ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ४८ व्या बैठकीत मंजुर करण्यांत आलेली अंदाजपत्रके. [उत्तर परिमंडळ].

अ.क्र.	विभाग.	वर्गवारी.	इमारतीचे नांव.	दुरुस्ती टप्पा / मंडळ/ना.ह.प्र.	मजल्यांची रहिवाश्यांची संख्या. नि+अनि=एकुण.	क्षेत्रफळ चौ.मी. दर चौ.मी. खर्च.	अंदाजपत्रकाची एकुण रक्कम. / निव्वळ टप्प्याची रक्कम.	रु.७५० चौ.मी. दराप्रमाणे मंजुरी करिता प्रस्तावित रक्कम.	रु.७५० चौ. मी. पेक्षा जादा असलेली रक्कम.	शेरा.
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१]	फग/द.	"अ".	इ.क्र.३१-३३ झिया मॅन्शन ना. म. जोशी मार्ग.	पाचवा टप्पा / मंडळ.	तळ+२ / ५९+१६=७५	१७१५.०० / ७०७.७३	१२१३७६०.०० / ३६६८१३.००	३६६८१३.००	—	मंजुर.
२]	फग/द.	"अ".	इ.क्र.३४६-३६४ हाजी कासम चाळ नं.२, डॉ.बी.ए.रोड.	चौ.टप्पा. / मंडळ.	तळ+३ / २९+११=४०	१४३१.२९ / ७९९.८९	११४४८८०.०० / ४५१४६४.००	३८००७१.५०	७१४१२.५०	मंजुर.
३]	फग/द.	"अ".	इ.क्र.२०९-२१३ साकुरवाला चाळ नं.१०, फर्ग्युसन रोड.	ति.टप्पा. / मंडळ.	तळ+ १ / ४४+१३=५७	१६६७.०० / ५६५.५१	९४२७१५.०० / ४६७१३८.००	४६७१३८.००	—	मंजुर.
४]	-"-	"अ".	इ.क्र. १६३ई, वसंत कुंज, डॉ.बी.ए.रोड.							
सुधारित अंदाजपत्रक :-										
५]	फग/द.	"अ".	इ.क्र.२९६-२९८ अंबाबाई चाळ,क्र.२, गणपतराव कदम मार्ग.	ति.टप्पा. सुधारित. / मंडळ.	तळ + ३ / ५३+४=५७	११०७.०० / १०३१.६६	११४२०५५.०० / ६६८५४७.००	३५६७४२.००	३९९८०५-०० —	मंजुर.

....५/-

८२

[दि. १५.१०.९७ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ४८ व्या बैठकीत सादर करण्यांत आलेली अंदाजपत्रके [उत्तर परिमंडळ].

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१]	फग/[illegible]	"अ".	५ खांडके बिल्डिंग, आर.के. वैद्य रोड, दादर [प].	तिसरा मंडळ.	तळ + ३ २७+९=३६	१७३५.०४ ६४९.५३	१३,२६,९६९/- ७,३८,५१७/-	७,३८,५१७/-	—	मंजूर.
२]	फग/उ.	"क"	निर्मला इमारत, मोरे नगर माहिम.	पहिला मंडळ.	तळ+३ १६+०=१६	११५०.०४ ६१६.५०	७,०९,००६/- ७,०९,००६	७,०९,००६/-	—	मंजूर.
३]	फग/उ.	"ब"	१०२-ई, माधववाडी, नायगांव क्रॉस रोड, दादर.	दुसरा मंडळ.	तळ + ३ २३ + २=२५	९८४.०० ७३९.१८	७,२७,३६०/- ६,०९,५११/-	६,०९,५११/-	—	मंजूर.
४]	-"-	"अ"	इ.क्र.२ खांडके बिल्डिंग, एन.सी. केळकर रोड, दादर.	तिसरा मंडळ.	तळ+२ ४२+०=४२	२१३२.३१ ४७९.४५	१०,२२,३३९/- ६,५५,७३९/-	६,५५,७३९/-	—	मंजूर.
५]	[illegible]	"अ"	इ.क्र. ३०-३१, टिंबर टेरेस भारत मेन्शन, के.ए. सुब्रम्हण्यम रोड.	चौथा मंडळ.	तळ+२ ७१+१९=९०	२१३६.८० ४८६.१९	१०,३८,९०४/- ५,५७,९१८/-	५,५७,९१८/-	—	मंजूर.
६]	-"-	"अ"	इ.क्र. ३९-४१ इलम महल, आर.के. एस.के. बोले रोड दादर [प].	तिसरा मंडळ.	तळ+४ ४२+१०=५२	१४८१.९२ ७४०.५५	१०,९७,४३५/- ६,३५,१८९/-	६,३५,१८९/-	—	मंजूर.
७]	-"-	"अ"	इ.क्र. ९१, पारिजात, प्लॉट नं. ९०, डॉ. एम्. बी. राउत मार्ग.	पहिला मंडळ.	तळ+ ३ ८+०=८	५१४.७५ ५९१.९४	३,०४,७००/- ३,०४,७००/-	३,०४,७००/-	—	मंजूर.
८]	-"-	"अ"	इ.क्र. [illegible], माहिम.	चौथा मंडळ.	तळ+१ १६+०=१६	२६७.७३ ७८५.८५	२,१०,३९७/- १,४१,६३२/-	१,३२,०३३/-	९,५९९/-	मंजूर.

....६/-

१५

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
९]	क.ग./उ.	"अ"	इ.क्र. ३७३ पटेल महल, भांडारकर रोड, माटुंगा.	प. पु. / मंडळ.	तळ+२ / २८+१२=४०	११४९.४७ / ६७६.०१	७,७७,०५८/- / ७,७७,०५८/-	७,७७,०५८/-	—	मंजूर.
१०]	-"-	"अ"	इ.क्र. ११, देवया मंझिल, शिवाजी पार्क रोड. दादर.	दूसरा / मंडळ.	तळ+३ / ८+२=१०.	७२१.५० / ८२४.३३	५,९४,७५८/- / ५,०४,१५८/-	५,४१,१२५/-	५३६३३/-	मंजूर.

८

दिनांक १५.१०.९७ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यांत आलेल्या दक्षिण परिमंडळातील दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांची यादी.

परिशिष्ट "ब"

"अ" विभाग.

अ.क्र.	इमारतीचा तपशिल.	दुरुस्तीचा टप्पा / मंडळ/ना.ह.प्र.	मजल्यांची संख्या. / रहिवाशांची संख्या.	बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर	अंदाजपत्रकांची एकुण रक्कम. / निव्वळ टप्प्यांची रक्कम.	रु.७५०/- प्रति चौ.मी. मर्यादितील रक्कम.	जादा रक्कम.	शेरा.
१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१]	१८ दुसरी कोळी लेन..	तिसरा मंडळ.	तळ+१ / ११+०=११	१८६.०३ / १२४४.१५	२३१४४७/- / १६०७६१/-	६८८३८/-	११९२३/-	मंजूर
२]	४९-५१ कुलाबा रोड..	चौथा. मंडळ.	तळ+३ / ६+४=१०	१५४५.८५ / ६९८.४५	१०७१६९३/- / ३७१२४९/-	३७१२४९/-	---	मंजूर
३]	१६ कावसजी पटेल स्ट्रिट..	तिसरा मंडळ.	तळ+४+ॲटीक / २+६=८	३८०.७० / ७५९.९३	२८९३०९/- / १८९५९/-	१५१७९/-	३७८०/-	मंजूर
४]	१७-२१ तिसरी पास्ता लेन..	दुसरा मंडळ.	तळ+५ / २१+५=२६	१५१७.१५ / ४८४.०१	७३४३१६/- / ५९०१८६/-	५९०१८६/-	---	मंजूर
५]	६८ घोगा स्ट्रिट [शरिन मंझील].	चौथा. मंडळ.	तळ+५ / [illegible]२=१८	४१०.०० / ९३१.८०	३७७९३८/- / १७७८३८/-	१०५४००/-	---	मंजूर
६]	७७-७९ मोदी स्ट्रिट..	तिसरा मंडळ.	तळ+४+५पार्ट / १५+९=२४	७००.६३ / ११२७.८६	५९०२१७/- / ४५८९६५/-	१९४२२५/-	२६४७४०/-	मंजूर
७]	६१ बोरा बाजार स्ट्रिट.	पहिला मंडळ.	तळ+५ / ८+८=१६	८२६.०० / ७२०.९४	५९५४१८/- / ५९५४१८/-	५९५४१८/-	---	मंजूर
८]	१७६-१८० पी.एन. स्ट्रिट.	पहिला मंडळ.	तळ+४ / ४+१३=१७	१२८७.२१ / ६९५.८८	८९५७५४/- / ८९५७५४/-	८९५७५४/-	---	मंजूर.

...२/-

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
३]	१४ पिठा स्ट्रिट..	तिसरा / मुंडळ.	तळ+४+५पार्ट / ४+३=७	२५१.०० / १५६०.२८	३९१६३२/- / ३१६३३२/-	११२९५२/-	२०३३८०/-	मंजुर.
				एकुण.	५३८५७२४/- / ३६६५४६२/-	३०३१२०१/-	६३४२६१/-	

९०९

"बी" विभाग.

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१]	४५ जंजीकर स्ट्रिट..	तिसरा मंडळ.	तळ+३ १६+२७=४३	१६०७.७६ ७४७.४३	१२०१६१७/- ६२९५१७/-	६२९५१७/-	---	मंजूर
२]	९६-१०४ जेल रोड [पू].	चौथा. मंडळ.	तळ+२ १७+४=२१	४९०.०० ७२८.७५	३५७०९०/- १३५२४४/-	१३५२४४/-	---	मंजूर
३]	१६उमरखाडी, दुसरी छेद गल्ली.	चौथा. मंडळ.	तळ+३ १३+०=१३	४५३.४० ९५५.५७	४३३२५८/- २२४७०३/-	१३१४९५/-	९३२०८/-	मंजूर
४]	७९-७९ अ काबेकर स्ट्रिट..	दुसरा. मंडळ.	तळ+२ ८+४=१२	३४३.८० ७३३.२९	३५२१७६/- २११२६५/-	२११२६५/-	---	मंजूर..
५]	४-४अे आणि ५-५बच नवरोजी हिल रोड नं. १.	पहिला मंडळ.	तळ+५ ८४+१४=९८	२९०२.२१ २७१.२५	७८७२२७/- ७८७२२७/-	७८७२२७/-	---	मंजूर.
६]	१८१-१८७ निशानपाडा रोड..	तिसरा मंडळ.	तळ+३ २१+७=२८.	६२०.२० ७२१.८५	४४७६९१/- २९१७५४/-	२९१७५४/-	---	मंजूर
					३४७९१३९/- २२७९७१०/-	२१८६५०२/-	९३२०८/-	

903

सी-१/२ विभाग/

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१]	४६९-४७५ मौलाना आझाद रोड.	तिसरा / मजला.	तळ+२ / ९+७=१६	५३०.९५ / ११८८.४४	६३१००३/- / २५१००३/-	१८२१२/-	२३२७९१/-	मंजुर.
२]	१५-१७ मारुती लेन किंवा ७२-७६भुलेश्वर.	पहिला. / मजला.	तळ+२ / २१+५=२६	६५७.६८ / ७३९.३१	४८६२२७/- / ४८६२२७/-	४८६२२७/-	---	मंजुर.
३]	२/२अ-४ अदुसरा भोईवाडा.	दुसरा. / मजला.	तळ+४+५[अंशत] / २५+१३=३८.	१०६९.२० / ७३४.८८	७८५७३०/- / ४६५७३०/-	४६५७३०/-	---	मंजुर.
४]	१०३ अली उमर स्ट्रिट.	दुसरा / मजला.	तळ + ३ / ३ + १=४	१८६.१३ / १४०९.२२	२६२२९९/- / २४१६५४/-	१११९००/-	१२२७०१/-	मंजुर.
५]	१९९-२०५ बारा इमाम रोड किंवा १२० -१२२ -१२८ ... २१५	तिसरा / मजला.	तळ+३+४[अंशत:] / २८+१०=३८	८८३.०० / १०२०.१६	९००८०६/- / ५४५००९/-	३०६४५३/-	२३८५५६/-	मंजुर.
६]	३७-४१बनियन स्ट्रिट..	पहिला. / मजला.	तळ +४ / २६+३६=६२	१३७३.०० / ४१०.०३	५६२९७३/- / ५६२९७३/-	५६२९७३/-	---	मंजुर
७]	२२/३४ बनियन स्ट्रिट किंवा १२३-१२५ काझी स्ट्रिट.	तिसरा / मजला.	तळ+३+४ / २३+८=३१	९६४.३१ / ७५४.६४	७२७७१०/- / ४२९४३०/-	४२४९५३/-	४४७७/-	मंजुर.
८]	१८८ चिमणा बुच्चर स्ट्रिट..	तिसरा / मजला.	तळ+३ / ४६+११=५७	१४६०.७१ / ७०८.७१	१०३४६१७/- / ६०९६७५/-	६०९६७५/-	---	मंजुर..
९]	१४२-१४४ अब्दुल रहेमान स्ट्रिट.	पहिला[ह] / मजला.	तळ+४+५ / २०+८=२८	१६९६.२१ / १४६९.१८	२४९२०४२/- / २४९२०४२/-	३४७७७४/-	१२१११८०/-	मंजुर.
१०]	२३६-२४० संतसेना महाराज मार्ग.	दुसरा / मजला.	तळ+२ / ८+१५=२३	३३७.६२ / ८७६.२०	२९५८२३/- / ९१४४९८/-	१५१८९०/-	४२६०८/-	मंजुर.
११]	१०४/१०६ धाकमोडिया स्ट्रिट.	चौथा. / मजला.	तळ + ५ / १४+३=१७	६४५.०० / ९३५.०५	६०३११२/- / २६०४८४/-	१४१११२/-	११९३६२/-	मंजुर.
					४४२५५९४/- / ३५५६६१९/-	१२५०४६१/-	१३७३१५०/-	

904

"सी-३/४"

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१]	२५३-२५५ डॉ. सी. एच. स्ट्रिट..	दुसरा. मंडळ.	तळ+३+४[अशंत:] ४ + १ = ५	३०४.७६ २२६४.५८	६९०१५५/- ५३०१५५/-	६८५७०/-	११५८५/-	मंजुर
२]	३४-३६ महादेव शंकर लेन..	चौथा मंडळ.	तळ + ३ ४ +०=४	३६४.४१ ७३७.५२	३६८७६०/- १२६३४१/-	१२६३४१/-	----	मंजुर
३]	११८-१२२ सिताराम पोदार मार्ग.	दुसरा. मंडळ.	तळ+१+अॅटीक. ५ + २ =७	३१०.७९ ७७३.८३	२४०४९८/- १४७४९८/-	१४००९२/-	७४०६/-	मंजुर
४]	३४३-बी, डी, काळबादेवी रोड.	तिसरा. ४५८३	तळ +४ [अशंत:] ५१+७=५८	११०५.४६ २८०६९७	९९२३०६/- २८६२८७/-	१२४०८०/-	१६३२१०/-	वा. शा. बदल... च्या अटीस ... राहुन प्रस्ता... मंजुर.
५]	८१ कॅव्हल क्रॉस लेन नं. २.	दुसरा मंडळ.	तळ + १ १ +३=४	२४२.५६ ८२९.५५	२०१२९७/- १६४६६६/-	१४५३७०/-	१९२९६/-	मंजुर.
६]	२१६-२२० व्हिगास स्ट्रिट..	दुसरा सुधारित मंडळ.	तळ + २ ५ +१=६.	१८४.३६ ७४५.५६	१३७४५२/- १२६०४८/-	२७५९१/-	---	मंजुर.
					२५३०३८८/- १३८१९९८/-	६३२०४४/-	६५१४९७/-	

906

डी-१ विभाग.

१]	१८/१८ अे.डी.डी.साठे मार्ग.	दुसरा / मंडळ	कळ + ३ / ४+१७=२१	५१७.०० / ७४६.००	३८५६८७/- / ३५०१२१/-	३५०१२१/-	——	मंजूर.
२]	३६-३६ अे,के.एम.मुन्शी मार्ग.	पहिला / मंडळ	तळ + ४ / १७+४=२१	३३३०.४३ / ५४६.९२	१२१९८७४/- / १२१९८७४/-	१२१९८७४/-	——	मंजूर.
३]	६९ बाणगंगा रोड.	दुसरा / मंडळ	तळ+१+२ / अशतः / ९+०=९	३३६.५३ / ५२७.३९	१२४७४५/- / १०२८७२/-	१०२८७२/-	——	मंजूर.
४]	१३०अ खाडीलकर रोड.	तिसरा / मंडळ.	तळ + ३ / ४०+०=४०	५३७.८८ / ३५४.०६	९१४४०७/- / ६०९९१३/-	६०९९१३/-	——	मंजूर.
५]	२४-२४ अ खोताची वाडी.	चौथा / मंडळ	तळ +३ / ४७+०=४७	८७८.३९ / ७३८.९३	६४९०६५/- / ४१७५५३/-	४१७५५३/-	——	मंजूर
६]	५ बेनाम हॉल क्रॉस लेन.	पहिला[अ] / मंडळ.	तळ+१+पी.अम. / २+०=२	४४६.०२ / ७४१.२५	३३०६१४/- / ३३०६१४/-	३३०६१४/-	——	मंजूर.
७]	३३४-३४२ एस.व्ही.पी.रोड.	पहिला[अ] / मंडळ.	तळ + ५ / १०+१०=२०	१०६०.९३ / ६१८.२६	६५५९३१/- / ६५५९३१/-	६५५९३१/-	——	मा.सदस्य श्री.उत्तम यांची पहाणी करण्याचा अटीस अधिन मंजूर.
८]	८६ वाळकेश्वर.रोड.	दुसरा / मंडळ.	तळ+४+५ / भाग. / १०+१०=२०	१३९६.०० / ७१४.६१	[illegible] / ८९२५९४/-	८९२५९४/-	——	मंजूर.
९]	४३ जे.एस.एस.रोड.	तिसरा / मंडळ.	तळ+२+अॅटीक / ८+८=१६.	४७२.०० / ७३९.११	३४८८५८/- / १५०२६६/-	१५०२६६/-	——	मंजूर

९०८

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१०]	२२९ डी, राजाराम मोहन रॉय मार्ग.	पहिला मंडळ.	तळ + २ ६+१ = ७.	३८४.६८ १५३३.६६	५८९९६८/- ५८९९६८/-	२८९९६८/-	३०१४५८/-	मंजुर.
११]	२०८ ठाडीलकर रोड.	चौथा मंडळ.	तळ + ४ २५+१०=३५	८०५.०० २०८७.५०	१६८०४३५/- १३४१७२२/-	२६५०३५/-	१०७६६८७/-	मंजुर.
१२]	७ एन.एस.पाटकर मार्ग.	चौथा ~~मंडळ~~ 7/64	तळ + ४ ९+१२=२१	५४२५.०० ४४४.०१	२४०८७४४/- १७५८७४४/-	१७५८७४४/-	——	मंजुर.
					१०३०५९२२/- ८४१२१७२/-	७०३४०२७/-	१३७८१४५/-	

999

"डी-२ विभाग"

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१]	२०१ अे, ताडदेव रोड[पालव चाळ].	दुसरा / मंडळ.	तळ + २ / ४०+२=४२	६७७.३२ / ७३९.९१	५०११५३/- / १६२४९३/-	१६२४९३/-	---	मंजुर
२]	९ फोर्जेट हिल रोड.	दुसरा / मंडळ.	तळ + ३ / १५+५=२०	१७९३.७५ / २८५.९७	५१२९५४/- / ३३२९५४/-	३३२९५४/-	---	मंजुर
३]	४६८-अे, आॅर्थर रोड.	तिसरा / मंडळ.	तळ + १ / ३९+०=३९	७२७.६६ / ७४६.४०	५४३१२५/- / ३३९४५४/-	३३९४५४/-	---	मंजुर
४]	३११ ई. एम. ब्लाॅक, बेलासिस रोड.	पहिला / मंडळ.	तळ + ४ / १०+०=१०	५८८.०० / ६२८.४७	३६९५९२/- / ३६९५९२/-	३६९५९२/-	---	मंजुर.
५]	८४ आर्देशिर दादी स्ट्रिट.	दुसरा / मंडळ.	तळ+३+४[भाग] / ४ + १ = ५	३२४.३० / ७१९.३९	२३३२९९/- / १६३५७४/-	१६३५७४/-	---	मंजुर.
				एकुण..	२१६०१२३/- / १३६८०६७/-	१३६८०६७/-	---	

११२